# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : ११ दिनांक:- २५/०६/२०२१**

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर व सर्जेपुरा झेंडीगेट, सारसनगर, चेतना लॉन मनपा(नप्रई) पंचपीर चावडी सथ्था कॉलनी इत्यादी परिसरामध्ये करोना या विषाणूमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थितीमुळे रस्ते बंद करण्यासाठी बॅरेकेटींग केल्याबाबतचे देयक अदा करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** १) दि.२९/०३/२०२० व दि. ०६/०४/२०२० रोजी मा. शहर अभियंता व मा. प्रभाग अधिकारी . प्रभाग समिती क्र. ३ व पोलीस प्रशासन यांचे भ्रमणध्वनी द्वारे प्राप्त आदेशानुसार.

२) दि. १३/०४/२०२० रोजीची प्रशासकिय मान्यतेची टिप्पणी.

३) सां. बा. विभाग जा. क्र. १३/२०२० दि. २२/०४/२०२० अन्वये श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांना दिलेले आदेश.

४) जा. नं, साप्रवि/पीए-११० दि. १३/०५/२०२० रोजीचे आदेश.

५) जा. नं, साप्रवि/पीए-१३८ दि. १७/०५/२०२० रोजीचे आदेश.

६) शासन निर्णय क्रमांक:एफ़एफ़सी-२०१९/प्र. क्र.५१/नवी-४/मंत्रालय, मुंबई अन्वये शासन निर्णय.

७) श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांनी सादर केलेले देयक क्र. ४१ दिनांक १५/०५/२०२० व देयक क्र. ४२दि. १९/०५/२०२० तसेच देयक क्र. ४३,४४ व ४५ दि. ०४/०५/२०२०..

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट सादर करण्यत येतो की, संदर्भ क्र. १ अन्वये दि.२९/०३/२०२० व ०६/०४/२०२० रोजी मा.शहर अभियंता, मा.प्रभाग अधिकारी प्रभाग समिती क्र.३ व पोलीस प्रशासन यांचे भ्रमणध्वनी वरुन आदेश आलेनूसार अनुक्रमे मुकुंदनगर व सर्जेपुरा येथील रस्ते बॅरेकेटींग लावुन बंद करणेबाबत आदेश दिले होते.

त्यानुसार दि. २९/०३/२०२० रोजी सहा.आयुक्त तथा प्रभाग अधिकारी श्री. संतोष लांडगे तसेच पोलीस डिपार्टमेंटचे अधिकारी यांचे समवेत मुकुंदनगर व सर्जेपुरा दि.०७/०४/२०२० रोजी शहर अभियंता व पोलीस प्रशासन मध्ये कोण-कोणते रस्ते बंद करण्याचे याबाबत पहाणी करण्यात आली. सदर पहाणी दरम्यान पोलीस उपअधिक्षक (DYSP) मा.श्री.संदिप मिटके साहेब यांनी सुचना केल्या. सदर पहाणीच्या वेळेस मुकुंदनगरच्या व सर्जेपुरा येथील खालील नमुद ठिकाणी बॅरेकेटींग करण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या आहेत.

सदर बाबत संदर्भ क्र. ३ अन्वये प्रस्ताव सादर करुन प्रशासकिय मान्यता घेण्यात आलेली असुन संदर्भ क्र. ३ अन्वये त्याबाबतचे आदेश श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांना देण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये तसेच वेळोवेळी प्राप्त होणा-या आदेशाप्रमाणे आवश्यक ठिकाणी तात्काळ बॅरेकेटींग करुन घेण्याट आलेले आहे.

**मुकुंदनगर** - १) हॉटेल पंचवटी २) ममता स्विट समोर ३) टॉप-अप पेट्रोलपंपासमोर -एक ४) टॉप-अप पेट्रोल पंपासमोर - दोन ५) PWD शेजारी ६) वनविभाग शेजारील रस्ता ७) इशरत कॉलनी (गोठ्याशेजारी) ८) सी.आय

व्ही सोसायटी ते केरुळकर मळ्याकडे रस्ता ९) सहारा सिटी १०) दर्गा दायरा ११) दरबार चौक उत्तर बाजू १२) दरबार चौक- दक्षिण बाजु १३) गोविंद पुरा (९२.१० मीटर म्हणजेच १०० रनिंग फुट बॅरेकेटींग करण्यात आले.

**सर्जेपुरा** -१) मिलन हॉटेल समोर २) मानसी मोटर्स शेजारी ३) बेलदार गल्ली ४) सर्जेपुरा गाईच्या गोठ्याजवळ व पतंजली किराणा दुकानाजवळ ५) सर्जेपुरा , अनमोल नागरी पतसंस्था समोर ६) अनमोल नागरी पतसंस्था समोरील आतील गल्लीत बोळमध्ये, पोलीस हेडकॉटची मागची भिंत, मुश्ताक शेख घराजवळ ७) सर्जेपुरा दक्षिण मुखी मारुती मंदिर जवळ, हरिजन वस्ती गेट ८) रंग भवन गेट ९) सर्जेपुरा चौक मधील बोळ १०) दक्षिण मुखी मारुती मंदिर ११) सर्जेपुरा चौक मेन रोड १२) सर्जेपुरा चौक जवळ, प्रियदर्शनी बिल्डींग जवळ १३) शिवम वाईन्स शॉपला चिटकुन १४) सर्जेपुरा सागर ऑटोमोबाईल शेजारी १५) रंगभुवन गल्ली बोळ १६) दक्षिण मुखी मारुती मंदिर मेन चौक, सर्जेपुरा १७) गोकुळ वाडी पेट्रोल पंप समोर. ( १०८.६० मीटर म्हणजेच ३५६ रनिंग फुट बॅरेकेटींग करण्यात आले.

तसेच **झेंडीगेट, सारसनगर, महानगरपालिका नविन प्रशासकिय ईमारत व चेतना लॉन्स ईत्यादी** ठिकाणी बॅरेकेटींग व पत्र्याचे बंदिस्त बॅरेकेटींग करण्याबाबत सुचना करण्यात आलेल्या होत्या.

सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक व महत्वाचे असल्यामुळे व त्वरित चालु करावयाचे असल्यामुळे सदर कामाचे निविदा प्रक्रिया राबवून कार्यारंभ आदेश देणे शक्य नव्हते. सध्या सगळीकडे कोरोना या विषाणू मुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थिती मुळे सदर कामातील मनपाचे नियमीत अनुभवी ठेकेदारापैकी श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांना सदरचे काम तातडीने , युध्दपातळीवर करण्यासाठी आदेशित करण्यात आले. त्यानुसार मंडप ठेकेदार श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांचेकडून उपरोक्त संदर्भीय आदेशान्वये वेळोवेळी बॅरेकेंटींग पोलीस बंदोबस्तात करुन घेण्यात आले आहे. सदरचे बॅरेकेटींग पुढील आदेश होईपर्यंत ठेवण्याबाबत सांगण्यात आलेले आहे.

वरील प्रस्तावित खर्च हा देश पातळीवर लॉकडाऊन ची मुदत दि.३०/०५/२०२० पर्यंत आहे. तथापि जर लॉकडाउनची मुदत वाढविण्यात आली तर सदर बॅरीकेंटींग करावे लागणार आहे तसेच ठेवून त्यानुसार सदरचा खर्च हा पुढील तारखेचा आदेश प्राप्त होईपर्यत जादा होऊ शकतो. त्यासाठी सदरच्या दरानेच संबंधीत ठेकेदाराकडून काम करणेबाबतच्या प्रस्तावास संदर्भ क्र. २ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर बॅरेकेटींग प्रकारचे काम या आगोदर मोहरम सणानिम्मित्त आर के मंडप &डेकोरेटर यांना रु.५५/- रनिंग फुट प्रमाणे देण्यात आलेले होते तथापि मा. लोकसभा निवडणूकीचे दर पहाता रु.१४/- प्रती रनिंग फुट इतका होता त्यानुसार श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांचेशी चर्चा केली असता अंतिम दर रु.१५/- रनिंग फुट प्रमाणे करण्यास सहमती दर्शवलेली असुन संदर्भ क्र. ५ अन्वये संबंधित ठेकेदार यांनी सदर बॅरेकेटींगचे देयक या विभागास सादर केलेले आहे.

सदर कामाची परिस्थिती आणिबाणीची व जनतेच्या सेवा सुरक्षेसाठी असल्याची खात्री असल्यामुळे व निविदा कार्यवाही करुन काम करणे अशक्य असल्यामुळे महानगरपालिका अधिनियम १९४९ लम ६७(३)क या मा. आयुक्तांच्या अधिकारामध्ये श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांचेकडून काम करुन घेण्यात आलेले असुन संदर्भ क्र. ७ अन्वये श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यानी देयक क्र. ४१ अन्वये १) मुकुंदनगर मुख्य १२ ठिकणी ३०० र. फु. दि. १५/०४/२०२० ते दि. ०३/०५/२०२० पर्यत एकूण १९ दिवसांकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. ८५,५००/-, २) सर्जेपुरा १७ ठिकणी बॅरकेट ३५६ र. फु. दि. १५/०४/२०२० ते दि. ०३/०५/२०२० पर्यत एकूण १९ दिवसांकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. १,०१,४६०/-, ३) मुकुंदनगर अंतर्गत रस्ते ३८ ठिकानी ११३१.६० र.फु. दि. १५/०४/२०२० ते दि. ०३/०५/२०२० पर्यत एकूण १९ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु.३,२२,५०६/-, ४) गोविंदपुरा, गुरुद्धारा, टॉप अप पेट्रोल पंप शेजारी २ ठिकाणी, बुर्हान्नगर कब्रस्तान येथे २ ठिकाणी, हिना पार्क मुकुंदनगर ईत्यादी परिसरामध्ये जादा काम झालेले बील ४५१

र.फु. दि. १५/०४/२०२० ते दि. ०३/०५/२०२० पर्यत एकूण १९ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. १,२८,५३५/- असे एकूण देयक रक्कम रु. ६,३८,००१/- आहे.

देयक क्र. ४२ अन्वये १) मुकुंदनगर मुख्य १२ ठिकणी ३०० र. फु. दि. ०४/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यम्त एकूण १४ दिवसकरेत १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. ६३,०००/-, २) सर्जेपुरा १७ ठिकणी बॅरकेट ३५६ र. फु. दि. ०४/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यम्त एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ७४,७६०/-, ३) मुकुंदनगर अंतर्गत रस्ते ३८ ठिकानी ११३१.६० र.फु. दि. ०४/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु.२,३७,६३६, ४) मुकुंदनगर जादा काम झालेले बील ४५१ र.फु. दि. ०४/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ९४,७१०/-, ५) महानगरपालिका मुख्य प्रशासकिय ईमारत ४० र.फु. दि. ०८/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण १० दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ६,०००/-, ६) झेंडीगेट याठिकाणी ३७० र.फु. दि. १२/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०६ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ३३,३००/-, ७) सारसनगर (शांतिनगर) ११३.१६ र.फु. दि. १३/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०५ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ८,४८७/-, ८) झेंडीगेट जादा काम ५५९ र.फु. दि. १४/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ३३,५४०/-, ९) सारसनगर (शांतिनगर) पाण्याच्या टाकी जवळ जादा काम ३५ र.फु. दि. १५/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०३ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. १,५७५/-, १०) चेतना लॉन्स येथे ९० र.फु. दि. १६/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०२ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. २,७००/-, ११) झेंडीगेट येथे जादा काम ५५ र.फु. दि. १६/०५/२०२० ते दि. १७/०५/२०२० पर्यत एकूण ०२ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. १,६५०/- असे एकूण देयक रक्कम रु. ५,५७,३५८/- आहे.

देयक क्र. ४३, ४४ व ४५ अन्वये १) मुकुंदनगर मुख्य १२ ठिकणी ३०० र. फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसांकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. ६३,०००/-,२) सर्जेपुरा १७ ठिकणी बॅरकेट ३५६ र. फु. दि. १८/०५/२०२० ते दि. २८/०५/२०२० पर्यत एकूण ११ दिवसांकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ५८,७४०/-, ३) मुकुंदनगर अंतर्गत रस्ते ३८ ठिकानी ११३१.६० र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. २८/०५/२०२० पर्यत एकूण ११ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु.१,८६,७१४/-, ४) मुकुंदनगर जादा काम झालेले बील ४५१ र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ९४,७१०/-,५) महानगरपालिका मुख्य प्रशासकिय ईमारत ४० र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ८,४००/-, ६) झेंडीगेट याठिकाणी ३७० र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ७७,७००/-, ७) सारसनगर (शांतिनगर) ११३.१६ र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. २३,७६३/-, ८) झेंडीगेट जादा काम ५५९ र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. १,१७,३९०/-, ९) सारसनगर (शांतिनगर) पाण्याच्या टाकी जवळ जादा काम ३५ र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ७,३५०/-, १०) चेतना लॉन्स येथे ९० र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. १८,९००/-, ११) झेंडीगेट येथे जादा काम ५५ र.फु. दि. १८/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १४ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ११,५५०/-, १२) पांचपिर चावडी, खाटीक गल्ली २५८ र.फु. दि. २२/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण १० दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.ऱ.फु प्रमाणे रक्कम रु. ३८,७००/-, १३) पांचपिर चावडी जादा काम २९९ र.फु. दि. २३/०५/२०२० ते

दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण ०९ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. ४०,३६५/-, १४) सथ्था कॉलनी बॅरेकेट ५८४ र.फु. दि. ३०/०५/२०२० ते दि. ३१/०५/२०२० पर्यत एकूण ०२ दिवसाकरीता १५ रु. प्र.दि.प्र.र.फु प्रमाणे रक्कम रु. १७,५२०/- असे एकूण देयक रक्कम रु. ७,६४,८०२/- आहे.

संदर्भ क्र. १ अन्वये सदरचा खर्च मा.आयुक्त यांचे मान्यतेने तसेच संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयानुसार सदरचा खर्च हा " **१४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मुलभुत आनुदानाचा पहिला हप्ता** " या लेखाशिर्षकामधून करणेकरीता मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदर कामासाठी झालेल्या खर्चाचे देयक मा. मुख्यलेखाधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर ठेकेदार श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर यांचे **देयक प्राधान्याने काढणेच्या** मान्यतेस सादर.

तसेच उपरोक्त प्रमाणे **देयक क्र. ४१ रक्कम रु. ६,३८,००१, देयक क्र. ४२ रक्कम रु. ५,५७,३५८/- व देयक क्र. ४३, ४४ व ४५ अन्वये रक्कम रु. ७,६४,८०२/- असे एकुण रक्कम रु. १९,६०,१६१/-** हे १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन सन २०१९-२० या आर्थिक वर्षातील मुलभुत आनुदानाचा पहिला हप्ता या लेखाशिर्षकातुन **श्रवण मंडप ॲण्ड लाईट डेकोरटर्स , अहमदनगर** यांना अदा करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, वरील अहवालानुसार कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना तातडीने करणेसाठी विविध ठिकाणी केलेल्या बॅरेगेटींगची बिले अ प्रमाणे मान्य करण्यास हरकत नाही. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची जा.क्र.२३४ दिनांक १०/०६/२०२० रोजी स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक जा.क्र.५०२ दिनांक १२/०६/२०२० रोजीचा अभिप्राय की, नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दि. २८ मार्च २०२० मधील अनु.क्र.५ प्रमाणे दिनांक ३/८/२०१५ मधील तरतुदी नुसार मा.महासभेची मान्यता घेण्याचे अधिन राहुन प्रचलीत बाजार भावाची खात्री करुन वाटाघाटी अंती विभागाने अ बाबत निर्णय घेता येईल.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मनपाकडे मोहरम सण मिरवणूक मार्ग बॅरेकेटींगचा मंजूर दर रु.५५/- प्रति र.फुट होता तथापि लोकसंस्थेच्या ----- तुलना करुन रु.१५/- प्रति र.फुट दराने वाटाघाटी केली श्रवण लाईट यांचे दर मान्यतेचे दि.०३/०४/२०१० पत्रासह प्रस्ताव मान्यता घेतलेनुसार देयक मान्यतेसाठी.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर फेरसादर रिपोर्ट की, चर्चा झालेनुसार प्रस्तावित देयक तक्त्यामध्ये निर्देशित करण्याचे दिलेल्या आदेशानुसार पुढील पानावर एकत्रित तक्ता प्रमाणे देयक मान्यतेस सादर.

| अ.क्रं. | बॅरेकेटींग ठिकाण | तारीख | दिवस | एकुण रनिंग फुट | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | मुकुंदनगर मुख्य ठिकाणे | १५-४ ते ३-५ | १९ | ३०० १५/-रु | ८५,५००/- |
| | | ४-५ ते १७-५ | १४ | ३०० १५/-रु | ६३,०००/- |
| | | १८-५ ते ३१-५ | १४ | ३०० --*-- | ६३,०००/- |
| | | | ४७ दिवस | | |
| २ | मकुंदनगर अंतर्गत | १५-४ ते ३-५ | १९ | ११३१.६० -*- | ३,२२,५०६/- |
| | | ४-५ ते १७-५ | १४ | --*-- | २,३७,६३६/- |
| | | १८-५ ते २९-५ | ११ | --*-- | १,८६,७१४/- |
| | | | ४४ दिवस | | |
| ३ | गोविंदपुरा व इतर | १५/९ - ३/५ | १९ | ४५१ १५ रु | १२८५३५/- |
| | | ४/५ - १७/५ | १४ | ४५१ -*- | ९४७१०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १८/५ - ३१/५ | १४ | ४५१ -*- | ९४७१०/- |
| | | | ४७ | | |
| ४ | सर्जेपुरा मुख्य प्र.इमारत | ८/५ - १७/५ | १० | ४० -*- | ६०००/- |
| | | १८/५ - ३१/५ | १४ | ४० -*- | ८४००/- |
| | | | २४ | | |
| ५ | चेतना लॉन | १६/५ - १७/५ | २ | ९० -*- | २७००/- |
| | | १८/५ - ३१/५ | १४ | ९० -*- | १८९००/- |
| | | | १६ | | |
| ६ | सर्जेपुरा | १५/४ - ३/५ | १९ | ३५६ -*- | १०१४६०/- |
| | | ४/५ - १७/५ | १४ | ३५६ -*- | ७४७६०/- |
| | | १८/५ - २८/५ | ११ | ३५६ -*- | ५८७४०/- |
| | | | ४४ | | |
| | झेंडीगेट | १२/५ - १७/५ | ६ | ३७० | ३३३००/- |
| | | १८/५ - ३१/५ | १४ | ३७० | ७७७००/- |
| | | | २० | | |
| | सारसनगर | १३/५ - १७/५ | ५ | ११३.६० -*- | ८४८७/- |
| | | १८/५ - ३१/५ | १४ | ११३.६० -*- | २३७६३/- |
| | | | १९ | | |
| | झेंडीगेट | १४/५-१७/५ | ४ | ५५९ | ३३५४०/- |
| | | १८/५-३१/५ | १४ | ५५४ | ११७३९०/- |
| | | | १८ | | |
| | शांतीनगर | १५/५-१७-५ | ३ | ३५ | १५७५/- |
| | | १८/५-३१/५ | १४ | ३५ | ७३५०/- |
| | | | १७ | | |
| | झेंडीगेट | १६/५-१७/५ | २ | ५५ | १६५०/- |
| | | १०/५-३१/५ | १४ | ५५ | ११५५०/- |
| | | | १६ | | |
| | पंचपीर चावडी | २२/५-३१/५ | १० | २५८ | ३८७००/- |
| | | २३/५-३१/५ | ९ | २९९ | ४०३६५/- |
| | | | १९ | | |
| | सथ्था कॉलनी | ३०/५-३१/५ | २ | ५८४ | १७५२०/- |
| | | | | **एकुणात एकुण** | **१९६०१६१/-** |

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्रमांक टी-१२ वर शाखा अभियंता यांनी सादर केलेल्या तक्त्यानुसार देयक १४ व्या वित्त आयोगामधून प्रस्तावित केले असल्यामुळे मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यचक आहे. तथापि आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सगळी मान्यता घेण्यांत येते का ? दरम्यान कोव्हीड ची उपाययोजना बाबत खुलासा करावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.मुलेप यांचे दिनांक १५/०६/२०२०चे अभिप्रायाचे अवलोकन करावे नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २८ मार्च २०२० मधील अनु.क्र.५ प्रमाणे दिनांक ०३/०८/२०१५ मधील तरतुदीप्रमाणे अ बाबत निर्णय घेता येईल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, लोक सभा निवडणूकीचे दराप्रमाणे देणेस मान्यता द्यावी.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.अविनाश घुले :-** माहिती द्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** मागील वर्षी कोरोना लाट सुरु झाली शहरामध्ये काही कंटेनमेंट एरिया डिक्लेर झाले. ते एरिया बॅरेकेटींग लावून बंदिस्त केले. केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता दिली. काही आयटेमचे रेट मंजूर होते. लोकसभेचे रेट मंजूर होते त्या रेटने दर आकारले काही रेट मा.आयुक्त यांचेशी निगोसिएशन करुन कमी केले. स्थायी समितीची मंजूरी मिळालेली आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** चर्चा करा मग घ्या अजुन पैसे कमी होतील का ते पहा.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** एप्रिल २०२० साली कोरोना प्रादुर्भाव वाढत असता मी मुस्लीम समाजाचा अपमान करण्याची क्लीप व्हायरल करायला कोणी आदेश दिले. तबलीक समाजाचा उल्लेख करुन मुकुंदनगर भागामध्ये सीसीटीव्ही लावण्यात आला नव्हता. सी.सी.टी.व्ही. लावण्याची गरज काय होती. पूर्ण प्रभागाला बंदिस्त केले ते आपत्कालीन मधून खर्च केले मग आम्ही कामे सांगीतले ते आपत्कालीन मधुन का करीत नाही. मुकुंदनगर मधील पुर्ण एरिया लॉक केला लोकांना फायदा झाला नाही. कचरा संकलन वाहनाव्दारे निजामुद्दीन व मस्कत समाजा बद्दल क्लीप व्हायरल केली. त्या बाबतीत पूर्ण समाजाची जाहीर माफी मागावी त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी कारवाई बाबत आदेश दिले त्याची माहिती द्या मा.न्यायालयाने सर्वांना निर्दोष घोषीत केले न्यूज चॅनलला दंड केला.

**मा.महापौर साहेब :-** अचानक विषय आला होता दीड वर्ष झाले मला विषयपत्रिकेवर विषय नाही. आपण सखोल माहिती घेवू. आसीफ सुलतान यांनी पत्र दिले.

**मा.महापौर साहेब :-** माहिती घ्या. दुसरा विषय घ्या सर्व मिळून चौकशी करु.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मुकुंदनगर व सर्जेपुरा झेंडीगेट, सारसनगर, चेतना लॉन मनपा(नप्रई) पंचपीर चावडी सथ्था कॉलनी इत्यादी परिसरामध्ये करोना या विषाणूमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थितीमुळे रस्ते बंद करण्यासाठी बॅरेकेटींग केल्याबाबतचे देयक अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : १२ दिनांक:- २५/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मुकुंदनगर परिसरामध्ये कोरोना या विषाणुमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थितीमुळे रस्ते बॅरेकेटींगव्दारे बंद करुन मुख्य आवश्यक रस्त्याच्या आत जाणा-या भागात सी.सी.टी व्ही कॅमेरा बसविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) सहा.पोलिस निरीक्षक, भिंगार (कॅम्प) पो.स्टे.,अहमदनगर यांचे जा.क्र.३२६/ २०२० दिनांक १५/०४/२०२० रोजीचे पत्र.

२) श्री.मंदार मुळे, अहमदनगर यांचे दिनांक १७/०४/२०२० रोजीचे पत्र.

३) श्री.मंदार मुळे, अहमदनगर यांचे दिनांक २७/०५/२०२० रोजीचे देयक.

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, संदर्भ क्र. १ अन्वये मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आदेश क्रं. आव्यमपु/कार्या१९अ/३०७/२०२० अन्वये दिनांक १०/०४/२०२० रोजी सकाळी ०६.०० ते दिनांक २४/०४/२०२० रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत मुकुंदनगर हा भाग हॉटस्पॉट घोषित करण्यात आलेला आहे. प्रशासनामार्फत आत / बाहेर जाण्याकरीता ईरीगेशन मस्जिद या ठिकाणी प्रवेशव्दार ठेवण्यात आलेले असुन मुकुंदनगर भागातील नागरीक पोलीस प्रशासनाशी नेहमी हुज्जत घालत असतात. त्यामुळे आपले कार्यालयाकडून सदर ठिकाणी सी.सी.टी.व्ही.कॅमेरा बसविणेबाबत विनंती केलेली होती.

सध्या सगळीकडे कोरोना या विषाणूमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थिती मुळे सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक व महत्वाचे असल्यामुळे व त्वरीत करावयाचे असल्यामुळे सदर कामाची निवीदा प्रक्रिया राबवुन कार्यारंभ आदेश देणे शक्य नव्हते. तसेच मा.शहर अभियंता यांनी मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्याशी चर्चा केली असता सदर काम अत्यावश्यक असल्यामुळे त्वरीत करुन घेणे बाबत आदेशीत करण्यांत आलेले होते.

सदर कामाची परिस्थिती आणीबाणीची व जनतेच्या सेवा सुरक्षेसाठी असल्याची खात्री असल्यामुळे व निविदा कार्यवाही करुन काम करणे अशक्य असल्यामुळे सी.सी.टी.व्ही. विक्रेत्यांना संपर्क करुन स्पॉट कोटेशन मागविले असता तीन कोटेशन या कार्यालयास प्राप्त झाले व ते शहर अभियंता यांच्या दालनामध्ये फोडण्यात आले. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | मालाचा तपशील | दर |
|---|---|---|---|
| १ | रुचा ऍटोमोशन सिस्टम, शनी चौक, अहमदनगर | १) २० मि. २ एम.पी.एच.डी<br>२) ०४ पी/एस ए एम पी<br>३) ४ चॅनल x व्ही.आर<br>४) कॅमेरा केबल | **२३,२४६/-** |
| २ | स्टॅपलिंग इलेक्ट्रीकल इंजिनियर्स, टाकली कांदेशवाडी, ता.कर्जत, जि.अहमदनगर. | १) २० मि. २ एम.पी.एच.डी<br>२) ०४ पी/एस ए एम पी<br>३) ४ चॅनल x व्ही.आर<br>४) कॅमेरा केबल | **२१,८३०/-** |
| ३ | श्री.मंदार मुळे, स्वामी विवेकानंद चौक, गुजरगल्ली, अहमदनगर | १) २० मि. २ एम.पी.एच.डी<br>२) ०४ पी/एस ए एम पी<br>३) ४ चॅनल x व्ही.आर<br>४) कॅमेरा केबल | **१६,८७४/-** |

उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री.मंदार मुळे, अहमदनगर यांचे १६,८७४/- हे दर स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी होते. त्यानुसार श्री.मंदार मुळे, अहमदनगर यांचेमार्फत रक्कम रु.१६,८७४/- या दराने सदर काम करुन घेण्यात आलेले आहे व संदर्भ क्र.२ अन्वये उपरोक्त काम केल्याबाबतचे अहवाल श्री.मंदार मुळे यांनी ईकडेस सादर केलेले आहे. तसेच संदर्भ क्र.३ अन्वये श्री.मंदार मुळे अहमदनगर यांनी सदर कामाबाबतचे देयक दिनांक २७/०५/२०२० रोजी रु.१६,८७४/- अन्वये सादर केलेले आहे.

तरी वरील परिस्थीती पाहता मुकुंदनगर परिसरामध्ये कोरोना या विषाणूमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थीतीमुळे रस्ते बॅरकेटींगव्दारे बंद करुन मुख्य अत्यावश्यक रस्त्याच्या आत जाणा-या भागात सीसीटीव्ही कॅमेरा बसविणेच्या कामास व सदर कामाकरीता होणारा खर्च हा १४ व्या वित्त आयोगातुन सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानाचा पहिला हप्ता या लेखाशिर्षका अंतर्गत करणेच्या मान्यतेस्तव व सदर कामास कार्योत्तर मंजुरी मिळणेकरीता रिपोर्ट सविनय सादर.

तसेच श्री.मंदार मुळे, अहमदनगर यांचे सदर कामाचे देयक रक्कम रु.१६८७४ अदा करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी असे.

त्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.नगरविकास विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २८ मार्च २०२० मधील अनु.क्र.५ प्रमाणे दिनांक ३ ऑगष्ट २०१५ मधील तरतुदीनुसार मा.महासभेची मान्यता घेणेचे अधिन राहुन प्रस्तावित अ मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा करा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, चर्चा केली मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मान्य.

---*---

चर्चा :-

विषय क्रमांक १२ चे वाचन.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** १२ नंबरचा विषय मुकुंदनगर भागातील आहे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** सी.सी.टी.व्ही. बसवले नाही त्याचे बील देवू नका.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** पोलीस यंत्रणेच्या सूचनेनुसार सी.सी.टी.व्ही. बसवले फुटेज आपल्याकडे जमा करत आहे.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** मागच्या वर्षी इलेक्ट्रीक साहित्य खरेदी साठी नगरसेवकांना १ लाख दिले होते. आमचे म्हणणे १ लाख रुपयामध्ये १५-२० फिटींगा मिळाल्या तर बरे होईल. इलेक्ट्रीक विभागाला सांगीतले काही नगरसेवकांना २५-३० फिटींगा दिल्या आम्हाला का नाही. मिळाल्या मेहेत्रे रजेवर गेले ब-याच कालावधीनंतर ते आले. चाणक्य चौकापासून सारडा विद्यालयापर्यंत माझ वॉर्ड आहे. नगरसेवकाला तुम्ही जर २५-३० फिटींगा देवू शकत नाही त्याचा काय उपयोग.

**अभियंता श्री.मेहेत्रे :-** आपल्या मागणी नुसार त्या बसवल्या.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** ५० हजाराच्या फिटींगा घ्या व राहिलेल्या रक्कमेचे मटेरियल घ्या असे सांगीतले.

**अभियंता श्री.मेहेत्रे :-** इलेक्ट्रीक सुपरवायझरला अहवाल द्यायला सांगतो.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** एकही फिटींग मिळाली नाही.

**मा.महापौर साहेब :-** शहरात एलईडी ची कारवाई चालू आहे. १ महिना भरात शहरात ३५००० लाईट लागणार आहेत. त्याचा मेंन्टेनन्स सुध्दा तोच सध्या करणार आहे.

**अभियंता श्री.मेहेत्रे :-** २ सदस्यांना मी एलईडी फिटींगा दिल्या त्याबद्दल मी स्थायी समितीला दिलगीरी व्यक्त केली आहे. परेश लोखंडे व बाळासाहेब बोराटे यांना फिटींगा दिल्या.

**मा.श्री.अविनाश घुले :-** कावरे साहेबांच्या भावना समजून घ्या त्यांच्या वॉर्डात कमीपणा होतो. एकाच वॉर्डातल्या इतर नगरसेवकांना दिल्या.

**अभियंता श्री.मेहेत्रे :-** एलईडी च्या टेंडर काढतो आहोत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** उपायुक्त पठारे साहेब यांची अति.आयुक्त पदी निवड झाल्याबद्दल सर्व सभागृहाचे वतीने अभिनंदनाचा ठराव करावा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** एलईडी जोवर होत नाही तो पर्यंत प्रभागात लाईटचे मटेरियल उपलब्ध करुन द्यावे. पावसाळयातील खड्डे बुजविण्याचे काम सुरु झाले नाही. सावेडी नाल्यापासून पाईपलाईन पर्यंतचा रस्ता खराब झाला आहे.

**मा.महापौर साहेब :-** पावसाळयापुर्वी ही कामे करा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** मागील वर्षी ४ प्रभागा करीता टेंडर काढून कामे केली. निविदा प्रोसेस मध्ये आहे. कॉन्ट्रॅक्टरची बैठक घेतली आहे. पाउस कमी झालाकी मागच्या वर्षी प्रमाणे खड्डे बुजवण्याचे काम करुन घेण्यात येईल. निविदा प्रक्रिया चालू आहे. निविदा उशीरा मंजूर झाली.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** कल्याण रोड अमितनगर, आदर्शनगर येथे ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर आले लवकरात लवकर दुरुस्ती करण्यांत यावी.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** मागच्या आठवडयात पाहणी केली. आपत्कालीनमध्ये ते काम होणार आहे. मा.आयुक्त साहेब यांचेशी चर्चा केली आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** आपण विरोधकांना निधी उपलब्ध करुन दिला. पाणी पुरवठयाची काम केली पण अजुन काम झाले नाही. याबद्दल खंत वाटते.

**मा.महापौर साहेब :-** कल्याण रोडचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** लवकरात लवकर कल्याण रोडचा प्रश्न मार्गी लावावा. एक दिवसाचा गॅप कमी करावा.

**मा.महापौर साहेब :-** १५ ते २० टक्के पेक्षा पाणी वाढुन प्रेशर वाढते. १ महिन्याच्या आत रोज पाणी मिळेल अशी व्यवस्था झाली आहे. याकरीता मा.आमदार यांचे सहकार्य मिळाले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** अधिकारी कर्मचारी यांच्या चौकशा लवकर पुर्ण होत नाही.

**मा.महापौर साहेब :-** कायदेशीर बाबी पुर्ण करुन त्यांना काम करण्याची संधी देवू.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** अमृत व भुयारी गटार योजना १२५ कोटीची योजना आहे. ब-यापैकी बट्याबोळ झालेला आहे. तो काय आपला जावई आहे का. रस्ते त्याने वेगवेगळया भागातले फोडले. त्याने पुन्हा डांबरीकरण असेल पॅचींग करुन देणे बंधनकारक असतांना आपल्या अधिका-यांनी सांगीतले तर तो ठेकेदार येत नाही.

**मा.महापौर साहेब :-** आठ दिवसापुर्वी बिलासाठी येवून गेला. त्याला कामे नीट करायला सांगा व नंतर बील करा. आयुक्तांनी तसे निर्देश द्यावेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** त्याला काळे फासण्याची तयारी आहे. अधिकारी त्याला का पाठीशी घालतात.

**मा.महापौर साहेब :-** कोण अधिकारी आहे. किती मिटींगा झाल्या. किती मिटींगला ते आले नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** नांदेडच्या ड्रिम कन्ट्रक्शनचे काम दिले आहे. ३०-३२ लेबर आहेत. कोरोनामुळे अध्यंतरी काम थांबले होते. स्पीडमध्ये काम नव्हते. ६ महिन्यापर्यंत ५५ टक्के योजना केली. २ सुपरवायझर त्यांनी नेमले आहेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्तांनी सांगावे.

**मा.आयुक्त साहेब :-** ४-५ दिवसापूर्वी मी मिटींग घेतली आपल्या योजनेत ३ पार्ट आहेत.

**मा.महापौर साहेब :-** तो बीलासाठी पालिकेत येतो. नागरिकांच्या तक्रारी पाहिल्या आहेत. रस्त्याची चाळण त्याने केली. एक रोड त्याने ठेवला नाही. फक्त बिलाला येतो.

**मा.आयुक्त साहेब :-** नागरिकांच्या तक्रारी आहेत. रिस्टोरेशन होत नाही तोपर्यंत ठेकेदाराचे बील देणार नाही. फक्त एसटीपी चे बील देवू प्रत्येक महिन्याला ४० लाखाचा दंड आकारला आहे.

**मा.महापौर साहेब :-** एनजीटी ने दंड केला आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्याला ३० जुन पर्यंत मुदत आहे. तोपर्यंत संबंधित सदस्याची लेखी येत नाही. याबाबतीत कुणालाही प्रोटेक्ट करणार नाही. यामध्ये जर काही झाले तर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यांत येतील.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** त्यांच्याकडून दंड वसुल करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** त्यांचे कुठलेही बील असेल ते काम पूर्ण होईपर्यंत देण्यात येवू नये.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** याच्यावर कोणाची तरी जबाबदारी फिक्स करा. विहीत कालावधीत काम पूर्ण करा.

**मा.महापौर साहेब :-** एकतर त्यांना बोलावून घ्या काम काढुन घ्या. काळया यादीत टाका.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मी सकाळी फोन केला चौधरीनगर जवळ चेंबर साठी झाकणे पाहीजे होते तो झाकणे शिल्लक नाही. म्हणाला एवढा मोठा ठेकेदार तो झाकणे देवू शकत नाही.

**मा.महापौर साहेब :-** आजच त्याला बोलवा नाहीतर तुम्हाला जबाबदार धरु.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** आता सध्या मुरुम गाडी टाकुन घ्या.

**मा.महापौर साहेब :-** त्यांचेशी मिटींग करुन २ दिवसात जर त्याने केले नाही तर दुसरा ठेकेदाराकडून काम करुन घेवू.

**मा.श्री.अविनाश घुले :-** उड्डाणपुला खालील लाईन शिफ्ट करायच्या त्याच्यावर काय केले. अजुन पर्यंत कोणी हात घातला नाही. पाहणी केली एकदा रोड चालू झाला की मग शिफ्टींग करता येणार नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** मटेरियलची त्याने ऑर्डर दिली. ३० तारखेपर्यंत कामाचे त्याला सांगीतले आहे. त्याना नोटीस दिली आहे.

**मा.महापौर साहेब :-** सभागृहाच्या भावना तीव्र आहेत. तुम्ही जर काही केले नाहीतर तुम्हालाही जबाबदार धरु.

**मा.श्री.मालनताई ढोणे उपमहापौर :-** ड्रीम कंन्स्ट्रक्शन कडून कामे मुदतीत पुर्ण होत नसल्याने कार्यारंभ आदेश रद्द करणे बाबत कार्यवाही करावी. दंड संबंधित एजन्सीकडून वसुल करावा. तोपर्यंत केलेल्या कामाचे बील अदा करु नये. झालेला जादा खर्च त्यांचेकडुन वसुल करावा. काळया यादीत टाकण्यांत यावे. दुसरी निविदा काढा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** हरीत लवादाचा दंड ४ कोटी पर्यंत पोहोचला निकालात त्या अधिका-याकडून वसुल करावा असे म्हटले आहे. आयुक्तांनी अभ्यास करावा. जे अधिकारी जबाबदार आहे त्यांचेकडून वसुल करावा. पदाधिका-यांची जबाबदारी आहे का ?

**मा.श्री.अविनाश घुले :-** प्रशासनाची जबाबदारी नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** ३ महत्वाचे घटक आहेत. एनजीटीचे केस मध्ये कच-याचे मुद्दे होते. सीनानदी मुळे प्रदुषण होते. सात नाल्यामुळे प्रदुषण होते. या केसमध्ये तसे म्हटले आहे. एनजीटी ने जे डायरेक्शन दिले प्रदुषण तातडीने बंद करावे. यासाठी ७ नाले व एसटीपी प्लॅन्ट घेतला दुस-या डीपीआर मध्ये इतर भाग घेणार आहोत. ४० लाखाचा अहवाल सादर केला तर दंड माफ होवू शकेल. मुदत २०२१ पर्यंत आहे. सात नाल्यांपैकी ६ नाले पुर्ण करा असे बार चार्ट मध्ये सांगीतले आहे. कोरोना काळात लॉकडाउनमध्येही वर्क ऑर्डर, ड्रॉईंग ॲप्रुव्हल केले. ३१ ऑगष्ट पर्यंत ७ नाल्यांचे पाणी एसटीपी पर्यंत जाणे महत्वाचे आहे. रिस्टोरेशनला ० टॉलरन्स मी त्याला नोटीस दिली. स्पष्टपणे सांगीतले आहे. एसटीपी सिव्हील वर्क १०० टक्के पुर्ण केले आहे. डीपीआर मध्ये लाईटचे एस्टीमेट बनवून घेतले तर चालू करतांना कुठल्या अडचणी येवू नये याकामी वेळोवेळी दखल घेवून कारवाई करत आहोत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** उपमहापौरांनी सांगितल्या प्रमाणे ४ कोटी दंड आला ते भरावे लागले तर आपण का भरावे याची जबाबदारी निश्चित करावी. नगरकरांचा कामासाठी नाही निधी कॅश करीत, इकडे कोटयावधी रुपये कोर्टात भरायचे का.

**मा.महापौर साहेब :-** अधिका-यामुळे जर दंड झाला असेल तर जबाबदारी निश्चीत करा.

**मा.श्री.दत्ता कावरे :-** आपण पाणी योजनेसाठी चांगले काम केले. पाणी सोडणाराला फोन केला तर तो सांगतो प्रेशर नाही.

**मा.महापौर साहेब :-** आता ३ फुटापर्यंत लेव्हल आली आता प्रेशर नाही हा प्रश्न मिटला.

**मा.श्री.दत्तात्रय कावरे :-** पाणी टाक्या चांगल्या क्षमतेने भरल्या पाहीजे. प्रेशरने पाणी आले पाहीजे अशा सूचना आयुक्तांनी संबंधितांना द्याव्यात.

**मा.श्री.अविनाश घुले :-** सैनिक लॉनजवळ पीडब्ल्युडी चा सीडी वर्कच्या ठिकाणी कॉलम आल्यामुळे डायव्हर्ट केलेल्या पाईप मधुन पाणी जात नाही. त्यामुळे पाणी वाहत जात नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** तुम्ही फक्त अडचण सांगा २-३ दिवसात सर्व परवानग्या घ्यायची जबाबदारी आमची राहील तुमची यंत्रणा उभी करा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** ३० तारखेपर्यंत करावे लागेल.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** प्रभागात पाण्याची खुप समस्या आहे.

**मा.महापौर साहेब :-** महिन्या भरात पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** आपण अडीच वर्षात चांगले सभागृह चालवले त्याबद्दल आपले अभिनंदन. सर्व नगरकरांना न्याय दिला.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पाण्याचे प्रश्नाबाबतीत आपण सर्वांनी पाणीप्रश्न मिटवण्याचा प्रयत्न केला ९५ टक्के काम झाले. तुमच्या कारकिर्दीत तेच काम झाले त्याबद्दल आपले अभिनंदनाचा ठराव करतो. लाईटचे कामही आपल्या कारकिर्दीत होईल. सावेडी कचरा डेपोचा प्रश्न असेल, कचरा डेपो हलविण्याकरीता मा.आमदार, महापौरांनी सहकार्य केले. मनाचा मोठेपणा दाखवल्या बद्दल गणेश भोसले, भागानगरे यांचे आभार सर्व नगरसेवकांचे आभार. सगळयांना संघर्ष करावा लागला. गोरे सर, नगररचनाकार साहेब, बल्लाळ यांचेही अभिनंदन, इथापे आभार, निकम साहेब यांचे ऑक्सीजन प्लॅन्ट उभारणी बद्दल आभार.

बुरुडगावच्या समस्या सुटल्या पण काही बाकी आहेत. चाणक्य चौकाजवळील जाणारा रस्ता घनकचरा विभागातील १४ वा वित्त आयोगातुन निधी उपलब्ध करुन घ्यावा. या अगोदरच्या आयुक्तांबरोबर चर्चा झाली इथापेंना तशा सूचना दिल्या. ते वॉर्ड निहाय मार्गी लावा.

**मा.महापौर साहेब :-** इथापे लवकर एस्टीमेट सादर करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** एलईडी लाईट टेंडर

**अभियंता श्री.मेहेत्रे :-** कोर्टाने आठ दिवसापुर्वी निकाल दिला. बेस लाईन सर्व्हे १० जुलै पर्यंत पूर्ण होईल. प्रत्येक मीटर कनेक्शन निहाय सर्व्हे करीत आहे. थर्ड पार्टी इन्स्पेक्शन करुन स्थायी समितीकडे पाठविणार आहोत. एक फिक्स तारीख घ्या.

**मा.महापौर साहेब :-** लोकांच्या तीव्र भावना असल्याने लवकरात लवकर काम पूर्ण करावे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो. अमृतमुळे शहरात पाणी वाढले पण आमचा प्रभाग दुर्लक्षीत आहे.

**मा.महापौर साहेब :-** मुकुंदनगर फेज-२ पूर्ण आहे. टाक्यांची कामे पुर्ण झाली तुम्ही व्यवस्थीत माहिती घ्या. फेज-२ चे काम झाले आहे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** शुक्रवारी मला पाणी आले. आजपर्यंत आले नाही. आठ दिवस झाले पाणी आले नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** फेज-२ चे काम पूर्ण झाले आहे. टाकी सुध्दा पहिल्या टप्प्यात चालू करायचा प्रयत्न आहे. नागरिकांनी कनेक्शन घेतले तर चालू करता येईल. शट-डाउन मुळे पाणी वितरण विस्कळीत झाले आहे. काही घरात १०-१५ माणसे व कनेक्शन एक त्यांना सांगतो दोन कनेक्शन घ्या.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** पाणी वरच्या भागात काही दिवसा आड तर काही भागात तीन दिवसाआड येते.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** पाण्याच्या टाकीच्या खालच्या लोकांना कनेक्शन घ्यायला सांगीतले पण घेत नाहीत. फेज-२ पुर्णपणे कनेकशन घेतले नाहीत. कोणतीतरी एक चालू ठेवावी लागेल. जुन्या सिस्टीमवरुन कनेक्शन घेतले आहेत.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** सगळयांना सारखा गॅप द्या.

**मा.महापौर साहेब :-** कनेक्शन घेतले तर सर्वांना पाणी मिळेल का ?

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** हो पाहणी करण्यांत येईल.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** पारखी सरांनी चेंबर पाहीले आपत्कालीन मधुनकरुन द्या.

**मा.महापौर साहेब :-** आजच सभा संपल्यावर त्यांचेकडे जा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** लसीकरण अहमदनगर शहरात चालू आहे. अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आमचे लसीकरण करुन घ्या. असे नागरीक सांगतात. फोन करतात. आम्ही या शहराचे लोकप्रतिनिधी आहोत. लसीकरणाच्या बाबतीत अडचणी येतात. लॉकडाउनच्या काळात प्रतिनिधींनी फिरायचे नाही असे सांगीतले गरज असेल तेंव्हा धरता व इतर वेळी सोडून देता. ऑनलाईन पोर्टलवर नोंदवा सांगता कसे नोंदवायचे ते सांगा. काही नागरिकांकडे मोबाईल नाही. नियमावलीतच काम करा. मंगलकार्यालय ओपनींग केले दुस-या दिवशी बंद झाले. आम्ही काय करायचे लोड आमच्याकडे आल्यानंतर आम्ही लस कशी घ्यायची आम्हाला दोन वॉर्डात फिरावे लागते. आमचे कोणी ऐकत नाही. असे कसे सांगायचे केंद्रावर लसीचे नियोजन नाही. काहीतरी मार्गदर्शन करा. नाहीतर आम्हाला सांगा आम्ही वाहनातुन लोक घेवून येतो. त्यांना तुम्ही लस द्या. नगरसेवकांचे काम होत नसतील तर इथे सभागृहात काय पेपरमध्ये चर्चा येण्यासाठी करायची का. नोंदणीचे मोठे सेंटर करा. घरोघरी जावून नोंद करा.

**मा.महापौर साहेब :-** आता आपण बसू काय सुधारणा करता येतील त्या मार्गी लावू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अनेक ठिकाणी पॅचींगची मागणी आहे. रामचंद्र खुंट रस्ता खराब आहे.

**मा.महापौर साहेब :-** ४ था विषय घेवू.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** हे शेवटचे जनरल बोर्ड आहे. माझ्या पक्षाचा महापौर आहे म्हणुन कौतुक करतो. पाणी पुरवठा बाबतीत ज्या अडचणी होत्या अधिकारी, मा.महापौर यांनी दिवस दिवस भेट देवून कुठलाही गाजा वाजा न करता प्रसिध्दी न करता १०० टक्के काम केल्याचे श्रेय त्यांना दिले पाहीजे. सर्व नागरिकांचा महत्वाचा प्रश्न लाईटचा आहे. तो खूप मोठा प्रश्न महापौर यांचे काळात मार्गी लागला आहे. शहरात वाईट अवस्थेत पडलेला असायचा ६४ घंटा गाड्यांची खरेदी त्यांचे काळात झाली. हरीत पट्टे निश्चीत केले, पिंपळगांव माळवी येथे ७०० एकर तलावाच्या जागेवर महानगरपालिकेचे नावे लावून चित्रनगरी करीता जागा देण्याची रुपरेषा आखली आहे. कोव्हीडच्या अडचणी काळात नटराज, आनंद लॉन, बुथ हॉस्पीटल येथे कोव्हीड सेंटर उभारणी करुन सर्व सामान्यांचे जीवन वाचवण्याचा प्रयत्न केला. अमरधाम मधील मुलतानचंद बोरा ट्रस्ट दुसरी विद्युत दाहिनी चालू केली. सावेडी जॉगींग ट्रॅक येथे वृक्षारोपण केले. मालमत्ता धारकांचे शास्ती माफीचा निर्णय घेतला. सगळयात महत्वाचे उड्डाणपुलाचे काम मा.खासदार सुजयजी विखे पाटील यांनी शासकीय निधी मंजूर करुन ठेकेदाराच्या मागे लागून ३० टक्के काम केले. सकल मराठा समाजाला खुप मोठी जागा महापौरांचे काळात देण्यांत आली. मला स्वत:ला योगभवन करीता मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला. योजनेला आश्वासन दिले. आरोग्य केंद्रासाठी निधी उपलब्ध करुन दिला. प्रभागात चौपदरी रस्ता चालू आहे त्याबद्दल धन्यवाद. या अडीच वर्षात मला मा.महापौर व सर्व अधिकारी यांनी सहकार्य केले. अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी मदत केली. त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. उद्या रविवारी सॅडऑफ ठेवू. माउली सभागृहात सकाळी ९.३० वाजता कार्यक्रम ठेवला आहे. सर्व नगरकर व अधिकारी यांच्यावतीने येण्याची विनंती करतो. त्याठिकाणी त्यांनी केलेल्या कामाची चित्रफीत पाहण्यासाठी सर्वांनी यावे. महानगरपालिकेच्या वतीने मी आमंत्रण देतो.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** म्युकर मायकोसीसचे रुग्ण असतील त्यांना ५०,०००/- रुपयांची मदत महानगरपालिकेच्या वतीने देण्यांत यावेत.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** कोराना काळात जीव धोक्यात घालून ज्या नर्सेस स्टाफने काम केले त्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घ्यावा.

**मा.महापौर साहेब :-** कोरोना काळात जीव धोक्यात घालून ज्यांनी काम केले त्यांचा पुढच्या सभेत विषय घेण्यांत यावा. अडीच वर्षात एकही विषय आपण सभेच्या मध्ये घेतला नाही. मदत दिलीच पाहीजे.

**मा.श्री.मदन आढाव :-** प्रेमदान चौकापासुन जाणा-या मिलीट्रीची लाईन खोदली महानगरपालिकेने त्यांचेवर कारवाई करावी. गणेश चौक ते बोल्हेगांव रस्त्याचा विषय तातडीने मार्गी लावा. तो रस्ता दुरुस्त करावा.

**शहर अभियंता श्री.इथापे :-** नगर-मनमाड राज्य मार्गाचे काम चालू आहे. महापौर यांचे सुचनेनुसार पाहणी केली. मिलीट्रीचे वतीने काम चालू आहे. रस्ता आपला नसल्याने रक्कम वसूल करता येत नाही. मागच्या आठ दिवसात तीन ठिकाणी कॉक्रीट करण्यास भाग पाडले. जिथे क्रॉसींग केले तिथे जिथे कॉक्रीट असेल तिथे कॉक्रीट जिथे मुरुम असेल तेथे तात्पुरता मुरुम टाकावा असे पत्र देतो. रस्ता नविन करावा लागेल. निधीची आवश्यकता आहे. किरकोळ दुरुस्ती केली तरी खराब होणार आहे. तात्पुरती दुरुस्ती करु कालचा मातीचा भाग आहे. नविन रस्त्यासाठी नियोजन करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ४ थे महापौर म्हणुन रखडलेल्या कामांचा चांगल्या समस्या आपण सोडवल्या. कोरोना काळात महानगरपालिकेची परिस्थिती खराब असतांना वेगवेगळया भागातील प्रश्न सोडवले. सर्वांना निधी उपलब्ध करुन दिला कोरोनामुळे आपल्यास कमी वेळ मिळाला मा.आमदारांचे वतीने आपले अभिनंदन करतो. शेवटचा बोर्ड असल्याने मी काही काम सांगत नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** गेल्या अडीच वर्षाच्या काळात कोरोनाचा वावर आपल्यावर होता. अत्यंत कठीण परिस्थीतील शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत खंबीरपणे आपण उभे राहीलात. आपण व आमदारांनी हे शहर ९५ टक्के कचरामुक्त केलेले आहे. नागरिकांनी चांगले सहकार्य केले आहे. पाण्याचा प्रश्न होता आपण असतील, अधिकारी असतील येणा-या १०-२० वर्षांची पाण्याची भुक मिटवण्याचा प्रयत्न केला. त्या करीता अभिनंदन सदरचा प्रश्न आपण मार्गी लावला त्याबद्दल अभिनंदन. सर्व नगरसेवकांच्या वतीने मी मागणी करत आहे रोखीने ५ लाख निधी मिळतो त्याबाबत ठोस निर्णय घ्यावा. एकीकडे १० लाख दंड भरतो. सर्व नगरसेवकांच्या वतीने विनंती करतो. बजेटमध्ये विषय मंजूर होतो पण पुढे काहीच होत नाही. सभागृहात झालेली चर्चा ही सर्वोच्च असते. ती काय कटयावर बसून केलेली चर्चा नाही. आपण जाता-जाता रोखीच्या निधी बाबत तातडीने कार्यवाही करावी. गणेश भोसले यांनी मागणी केली. एकतरी रोख निधीतून चेक काढावा. आपले अभिनंदन चांगले काम आपल्या काळात झाले.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** बरोबर अडीच वर्षापुर्वी सर्वांना उत्सुकता लागली होती महापौरांना संधी मिळावी. अनेक स्थानिक स्वराज्य संस्था महाराष्ट्रात आहेत. काही मुलभुत अधिकार संस्थेला दिले आहेत. महसुल गोळा करुन तो सोडवण्याचा प्रयत्न करावयाचा असतो. शहराच्या महत्वाचा प्रश्न पाण्याचा होता. आत्ताची जी केंद्र सरकारची अमृत योजना आहे. ३५-४० कोटीचे नियोजन करुन काम चालू होते. अत्यंत हळू होते. महापौर सतत योजनेवर जात होते. अधिका-यांना बोलावुन घेणे, मिटींगा घेणे असे काम केले. सर्वांत जास्त बैठका पाणी योजनेसाठी घेतल्या. वेगवेगळया परवानगीचा प्रश्न होता. शेतक-यांच्या अडचणी होत्या. अडचणीतुन मार्ग काढुन निर्णय कौशल्याने निर्णय घेतले. ९५ टक्के काम झाले आहे.

दुसरा प्रश्न महत्वाचा कच-याचा होता. कच-याचे ढीग झालेले असायचे स्वच्छ भारत अभियानात आपला खुप दुरपर्यंत नंबर होता. आपणच पायाला भिंगरी लावून बारीक सूचना दिल्या. नियोजन कसे होईल याचे निर्णय घेतले. या सर्व कामामुळे थ्री स्टार मानांकन मिळाले देशात ४० वा नंबर आला.

शहरात ३५ हजार लाईट लावण्याचे नियोजन आहे. तोही प्रश्न आवश्य सुटेल. २ हायड्रोक्लोरीक वाहन खरेदी केल्यामुळे दुरुस्तीचा प्रश्न मार्गी लागेल. शासनाचा निधी मिळवतांना महापौरांनी ४० कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध करुन दिला आहे. मुलभुत असेल, दलितवस्ती असेल, त्याचबरोबर आरोग्याचे दृष्टीने श्रमिकनगर भागात आरोग्य केंद्र भुमीपुजन झाले आहे. गुलमोहोर रोड भागात योग केंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. स्टेशन रस्त्यावरील पुलाखालील रस्ता पुर्णत्वास नेला. नाटयगृहाचे काम आमदार व महापौर यांनी शासनाचा निधी मागवून प्रगतीपथावर आहे. सीटी बसही चालू केली. अडीच वर्षाच्या सुरुवातीच्या काळात लोकसभा , विधानसभा निवडणूका झाल्या. त्याच्या आचारसंहितेमुळे अडचणी यायच्या फेब्रुवारी २०२० महापौर निवडणूकीनंतर कोरोनाचे संकट आले. सातत्याने लॉकडाउन फिरण्यावर बंदी असायची अशा अनेक अडचणी असतांना एकदाही त्यांचेकडून अडचणी ऐकलया नाही. अडचणीतुन मार्ग काढायचा असतो असे त्यांचे म्हणणे असते. कौटुंबिक व्यापही त्यांचे मागे होतो. त्यांच्या आईचे दुःखद निधन झाल्यानंतर तीन दिवसांनी त्यांनी काम केले. केशव माधव सेंटरवर समक्ष भेट देवून पाहणी केल्या. या काळात लोकांचे मृत्यू झाले. गरीबांना मदती केल्या. प्रत्यक्ष भेटी दिल्या. काही वेळा अमरधाममध्ये नंबर लावून अंत्यविधीची वेळ यायची अशा प्रसंगी मुलचंद बोरा ट्रस्ट यांचेशी चर्चा करुन दुसरी विद्युत दाहिनी चालू केली.

शास्ती माफीचा प्रश्न मार्गी लावला या काळात सर्व पक्षीय नगरसेवक आमदार यासह त्यांचे सर्वांचे सहकार्य मिळाले. कोणतेही वादविवाद असले तरी प्रश्न मार्गी लागत आहेत. कधी कटुप्रसंग सभेत आले नाहीत. सर्व अधिकारी-कर्मचारी नगरसेवक यांचे सहकार्य लाभले. सभागृह नेता या नात्याने मी सभागृहाचे वतीने अभिनंदनाचा ठराव करतो.

उपमहापौरांनी त्यांचे खांद्याला खांदा लावून काम केले. त्यांचे कधीही कोणत्याही मुद्यावर वाद झाले नाहीत. इतर अधिकारी यांचेही वाद झाले नाहीत. धोरणात्मक निर्णय घेत असतांना उपमहापौरांचाही सहभाग असायचा. महिलांचा प्रश्न असेल अशा वेळी संबंधित अधिका-यांना ताबडतोब बोलावून व्यवस्था केली. वेगवेगळे निधी त्यांनी त्यांचे भागात टाकले. शहराच्या विकासासाठीचा मा.उपमहापौर असतील, प्रशासनातील अधिका-यांशी चर्चा करुन मार्गी लावायचे. सर्वांचे सहकार्य मिळाले. अभिनंदनाचा ठराव करतो.

**मा.श्री.अविनाश घुले :-** आज आपले वाकळे महापौर यांचा महापौर पदाचा शेवटचा बोर्ड आहे. सर्वांनी अडीच वर्षाच्या कारकिर्दीत जी कामे केली त्याचा लेखाजोखा आपले अनुभव येथे मांडले. महापौरांनी यशस्वी रित्या त्यांनी सांगीतले. इतके सर्व नगरसेवकांची कामे त्यांनी केली. महापौर पदही काटयाची खुर्ची असते. त्यांच्या बुध्दी कौशल्याने त्यांनी सर्वांना न्याय दिला. अमृत योजनेचा पाठपुरावा केला नसता तर अजुन ५ वर्ष योजना मार्गी लागली नसती. जेंव्हा भविष्यात अमृत किंवा फेज-२ चा विषय असेल अशा वेळी आयुक्त साहेब असतील यांची नांवे येतील. आपण चांगल्या प्रकारे विषय हाताळले. कोर्टाचे विषय सर्वांनी मार्गी लावला त्यामुळे महिना दीड महिन्यात पाणी देवू शकतो. असे म्हणू शकतो. आपली कारकिर्द सर्वांना बरोबर घेवून केली. आमदारांशी समन्वय ठेवून विकासाचे दृष्टीकोनातून चांगले पाउल टाकले. लाईटचा असेल पाण्याचा प्रश्न असेल, ४० वा मानांकनाचे श्रेय आपणास जाते. आपले काम सदैव सर्वांच्या स्मरणात राहील. आपण चांगले काम केले. ढोणे मॅडम यांनी चांगली साथ दिली. सर्व अधिका-यांनी चांगली साथ दिली. सर्वांचे पुनःश्च अभिनंदन.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** महापौरांचे ब्रीद वाक्य चर्चेचे व्दारे सर्वांशी खुले, इथुन मागचे बरेच महापौर झाले त्यांचे केबीनमध्ये गर्दी नसायची वेगवेगळे शिष्ट मंडळ महापौरांकडे यायचे व त्यांचेकडून काम करुन घ्यायचे. ते सर्व पक्षीय महापौर होते. कचराकुंडी मुक्त शहर त्यांनी केले. अत्यंत उत्कृष्ट काम त्यांनी केले. शहराचा पाणी प्रश्न येणा-या ५० वर्षाचा सुटला आहे. आपण एखाद्याच्या निरोप समारंभात जातो त्यावेळी त्यांना भविष्य काळाच्या शुभेच्छा देतो. विधानपरिषदेचे सदस्य व्हावेत अशी आशा व्यक्त करतो.

**मा.श्री.गणेश भोसले :-** अडीच वर्षाच्या काळामध्ये महापौर कसा असावा शेतक-याच्या घरातील जनतेतला महापौर झालेला सर्वांना आवडतो. सामान्य जसा पहिला होता तसेच ते वागले. साधी राहणीमानात त्यांचे काम त्यांनी चोख करुन दाखवले. पाणी योजनेचा पाठपुरावा केला. निधीची कमी पडू दिली नाही. सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देतो. उपमहापौर यांनी चांगल्या पध्दतीचे काम केले. नगर शहरात ठसा उमटवला. त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा.

**मा.श्री.मदन आढाव :-** शिवसेनेच्या वतीने महापौर, उपमहापौर यांनी अडीच वर्षाच्या काळात केलेल्या कामाचे अभिनंदन. अनिल भैय्या यांचे व महापौर यांचे संबंध जवळून पाहीले. जरी २४ शिवसेनेचे नगरसेवक असतांना बाबासाहेब महापौर झाले. अनिल भैय्या म्हणाले चांगले झाले शिवसेनेच्या वतीने आभार व्यक्त करतो. स्वर्गीय अनिल भैय्या यांचे वतीने आभार.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** या सभागृहात येण्यासाठी शेतकरी माणूस आहे. त्यांचेकडून मैत्री कशी टीकवायची हे शिकावे. उपमहापौर असतील, महापौर त्यांचे दिलेल्या शब्दामुळे मी सभागृहात आलो त्यांना आम्ही पुढील वाटचालीच्या शुभेच्छा.

**उपमहापौर सौ.मालन ढोणे :-** पुरनियंत्रण रेषेच्या हद्दीत पाणी शिरले का ? सहकार्य सप्लायर्स यांना काळया यादीत टाकण्यांत यावे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** महसूल विभागाकडून अद्याप माहिती प्राप्त झाली नाही. पुररेषेचा विषय डी.पी.२००५ व २०१२ ला मंजूर झाली. तोपर्यंत बांधकाम परवानगी दिली आहे. नियमानुसार ले-आउट कंम्पलीशन बांधकाम परवानगी दिली आहे. २०२० मध्ये पुरनियंण रेषा डी.पी.वर ट्रान्सफर केली आहे. विकसीत २ ठिकाणी भाग पुररेषेने बाधीत होतो. डिसेंबर २०२० मध्ये डीपीआर मध्ये लागू करा. त्यामुळे सध्या स्थगीत करीत आहोत.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** नविन पुररेषा घोषीत केले ते वाढवले का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** पुर्वी मार्ग केलेली नव्हती. पुरनियंत्रण रेषा एरिगेशनने सर्व्हेक्षण करुन मार्क केलेली आहे. श्रीगोंदा डीव्हीजनने केली डिसेंबर २०२० मध्ये क्लीअर डायरेक्शन दिल्या आहेत.

**मा.श्री.अविनाश घुले :-** पूर्वी परवानग्या दिल्या. आता नविनला देत नाही. शहराचा विकास सुरुच आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** यावर दाद कोणाला मागायची .

**मा.महापौर साहेब :-** पुरनियंत्रण रेषा आखतांना कोणताही विचार केला नाही. आपल्याला बदल करावे लागतील. १०० फुटी रस्ता गेला.पश्चिम बाजुला ठेवू. पालिकेचे उत्पन्न थांबते. परवानग्या दिलेल्या तशाच चालू ठेवून पुर्व बाजुला पूरनियंत्रा रेषा ठेवू नये असा ठराव करु.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** काही लोकांची दुकानदारी आहे. त्यावर निर्णय घ्यावा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** पुरातत्व खात्याची दिल्लीतून परवानगी आणली तर प्रत्येक कामास परवानगीची आवश्यकता काय आहे.

**मा.महापौर साहेब :-** तो रेफरन्स टाकुन परवानगी घ्यावी. मी दिल्लीला जावून त्या विभागाला भेट दिली आहे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मी जर परवानगी घेतली तर शेजारच्याला परवानगीची काय आवश्यकता. कोर्ट त्यामुळे बाहेर बांधावे लागले. बेग पटांगणाची जागा बांधू शकत नाही.

**मा.महापौर साहेब :-** परवानगी कशी शिथील करायची ते करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** नदीच्या पश्चिम बाजुला तेवढाच पट्टा ठेवा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कोव्हीड काळात काही बाहेरगावचे रुग्णांचे अंत्यविधी अमरधाममध्येझाले. बाहेरगावचे लोक आहे. त्यांच्या दाखल्यामध्ये चूका आहेत. त्या दुरुस्त करुन घ्या.

**मा.महापौर साहेब :-** घरपोच दाखले पोष्टाने ३२०० दाखले पाठवले. डॉ. राजुरकरांना सांगून तात्काळ दुरुस्ती करुन द्या.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** हॉस्पीटलला लवकरात लवकर नोंदी पाठवायला सांगा.

**ॲड.श्री. कातोरे :-** पुरनियंत्रण रेषेचा विषय १४ कि.मी.दोन्ही बाजुने आहे. कुकडी प्रकल्पाने सर्व्हे केला. ३, ३ १/२ वर्षापुर्वी बांधकामे झाले आहेत. महासभेस पुरनियंत्रण रेषा शिथील करणेचा अधिकार आहे का ? त्या खात्याचे मंत्री यांना अधिकार आहेत का ?

**मा.महापौर साहेब :-** आपण महासभेचा ठराव घेवू आपण परवानगी घेवू.

**ॲड.श्री.कातोरे :-** लसीकरणाचा ठोस निर्णय घ्यावा. पहिला डोस द्या किंवा दुसरा डोस द्या नागापूर आरोग्य केंद्रातील सर्वांची बदली करा. आम्ही सन्माननीय सदस्य आहोत.

**मा.महापौर साहेब :-** आपण स्वतः पाहणी करुन सुसूत्रता आणू.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** १८-३०, ३०-४५ व ४५ च्यापुढचे तीन ग्रुप केले जातात त्यात पण १ ला व २ रा डोस अशी वर्गवारी केली जाते.

**मा.महापौर साहेब :-** आपण एकत्र बसून निर्णय घेवू.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आपल्या वेगवेगळया कोर्टात केस चालू आहेत. कोर्टाने ताशेरे ओढले. आपले कडील तारखेला हजर होत नाही.

**मा.महापौर साहेब :-** कोर्ट विभाग व आपण एकत्र स्वतंत्र बैठक घेवू. महानगरपालिकेचे मृत १३ कर्मचारी त्यांचे प्रस्ताव लवकरात लवकर घ्यावे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. मुकुंदनगर परिसरामध्ये कोरोना या विषाणुमुळे निर्माण झालेली युध्दजन्य परिस्थितीमुळे रस्ते बॅरेकेटींगव्दारे बंद करुन मुख्य आवश्यक रस्त्याच्या आत जाणा-या भागात सी.सी.टी व्ही कॅमेरा बसविणेचे, कॅमेरा बसविणेच्या कामास व सदर कामाकरीता होणारा खर्च हा १४ व्या वित्त आयोगातुन सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात प्राप्त झालेल्या अनुदानाचा पहिला हप्ता या लेखाशिर्षका अंतर्गत करणेस्तव सदर कामास ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

ई- निविदा क्र. १०५९ सीना नदीवरील पुल बांधणेकामी याअगोदर मा.महासभा ठराव क्र. १७ दि.२३/११/२०११ अन्वये रक्कम रू.६,१२,६५,८१५/- ला मान्यता दिलेनुसार व मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे जा.क्र.५३७ दि.२६/०५/२०१७ अन्वये मिळालेल्या प्रशासकीय मान्यतेनुसार नागरी दलित वस्ती सन २०१०-२०११ व सन २०१२-२०१३ मधून रूपये १८० लक्षास व प्रशासकीय मान्यतेतील अट ७ नुसार उर्वरीत रक्कम मनपा फंडातून खर्च करणेचे अटीवर प्रशासकीय मान्यता मिळाली तद्नंतर सविस्तर अंदाजपत्रक केले असता रूपये ६२२.७७ लक्षचे सन २०१३-२०१४ चे दरसुचीनुसार सुधारीत अंदाजपत्रकास महासभा ठराव क्र.५० दि. ११/०२/२०१५ अन्वये मान्यता प्राप्त झाली. ई- निविदा क्र.१०५९ सन २०१५-२०१६ च्या दरसुचीनुसार प्रसिध्द केली असता सर्वात कमी दराची निविदा मे.ए.सी. कोठारी, अहमदनगर यांची निविदा २६.२९% जादा दराने होती तथापि चालू दरसुचीनुसार सन २०१५-२०१६ चे तुलना करून २३.६९% जादा दराने म्हणजे एकुण रूपये ७,५७,७९,६८७/- रकमेला मंजुरी मा.स्थायी समिती सभा क्र. ०२ विषय क्र.१५ दि.१०/०५/२०१६ अन्वये देण्यात येवून इकडील कार्यारंभ आदेश सा.बां.वि.जा.क्र.२११ दि.२७/०६/२०१६ अन्वये सदर कामाचा काम पुर्ण करण्याचा कालावधी १५ महिने (पावसाळयाचे दिवस सोडून) इतक्या मुदतीचा देण्यात आला. तथापि मनपा स्वनिधीची कमतरता असलेने सर्व काम उपलब्ध दलित वस्ती रक्कम रूपये १८०.०० लक्ष मधून होणे शक्य नव्हते. त्यामुळे शासन निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणात काम होत राहील तसेच शासकीय निधी + व्याजाचे रकमेतून त्यासाठी सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ पर्यत काम चालू आहे. त्याचबरोबर खोदाईची पक्का पाया खोल लागल्यामुळे पुलाची पायापासूनची उंची वाढल्याने त्याबरोबर मंजुर निविदेमध्ये रस्ता जोडची कमी परिमाणे व त्याची Retaining wall रस्ता बाजुची भुमिगत गटर अत्यावश्यकतेनुसार करावी लागते व पुलावर मोठया प्रमाणात रेल्वे स्टेशनकडे जाण्यासाठी हलकी व जड वाहतुक असलेने रात्रीचे वेळैसाठी विदयुत रोषनाई करावी लागली. व त्याचबरोबर अस्तित्वातील एम.एस.ई.बी.ची. एच.टी. लाईन व डी.पी. इतरत्र शिफ्ट करावी लागल्यामुळे व सदरच्या विद्युतीकरणाची बाब अंदाजपत्रकामधे नसलेकारणाने काम पुर्ण करणेच्या दृष्टीने त्याच ठेकेदाराकडून कामे करावी लागली. त्याचबरोबर मंजुर निविदेमध्ये अटी व शर्ती मधील भाववाढ कलम अनुज्ञेय नाही त्यामुळे २०१६-२०१७ पासून वर्षात कोणतेही अतिरिक्त भाववाढ ठेकेदाराला दिलेली नाही. त्याचबरोबर सन २०१७ पासून ते आजतागायत जी.एस.टी. लागू झालेला आहे. तो देखील निविदाधारकाला दिलेला नाही. तथापि मंजुर दरानेच म्हणजे कोणतीही भाववाढ मागणी न करता व अतिरिक्त जी.एस.टी.न मागता ठेकेदाराने संपुर्ण काम करून दिलेले आहे व उर्वरीत

विदयुतीकरणासह काम  करून देणार आहे व हे सर्व मनपाचे आर्थिक दृष्टया हितकारक आहे त्यामुळे अतिरिक्त सर्व बाबींसह व जादा देकारासह एकुण रक्कम रू. १० कोटीच्या आत काम करण्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता ही महासभा देण्यात येत आहे यामध्ये  कोणतेही भाववाढ, अतिरिक्त जी.एस.टी. किंवा कलम ३८ ची अतिरिक्त रकमेची मागणी कधी करणार नाही असे ठेकेदाराने प्रथम प्रतिज्ञापत्र घ्यावे हया अटीवर मान्यता देण्यात येत आहे. त्याचबरोबर मनपाची आर्थिकस्थिती पहाता महानगरपालिका फंडातून देयक देण्यात येणार नसल्याने प्राधान्याने दलितवस्ती निधीचे व्याज किंवा विकासभार या अथवा रोखीच्या अन्य लेखाशिर्षकातून किंवा महानगरपालिका फंडातुन प्राधान्याने देयक देणेस ही महासभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२  प्रस्ताव क्रमांक : १३  दिनांक:- २५/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** निविदाकार यांनी भरलेली निविदा डिपॉझिट रक्कम परत करणेस मंजुरी मिळणे बाबत सरिता डिस्ट्रीब्युटर्स, ठाणे यांचा दि.२८/११/२०२० रोजीचा अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- सरिता डिस्ट्रीब्युटर्स, ठाणे यांचा दिनांक २८/११/२०२० रोजीचा विनंती अर्ज.

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिका कै.बा.दे.दवाखाना सुतिका गृहा करीता Ethilon २-० - ७२० Foils व I.V.Ringer Lactate ५०० ml - १००० Nos इ.पुरवठा ई -निविदा क्रमांक १४३९ निविदाकार सरीता डिस्ट्रीब्युटर्स, ठाणे यांनी भरली होती. त्यांची निविदा मंजूर झाल्याने त्यांनी संगणकीय पावती क्र.FI०४/१५८९६ दिनांक २७/०२/२०१७ अन्वये डिपॉझिट रक्कम रु.१०,०००/- मात्र भरुन करारनामा करुन दिलेला आहे.

अर्जदार यांनी भरलेली निविदा सिक्युरीटी डिपॉझिट रक्कम परत मिळणे बाबत संदर्भीय अर्जान्वये मागणी केलेली आहे. पुरवठादार यांनी सदर निविदा डिपॉझिट रक्कम रुपये १०,०००/- फक्त तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर मागणी केलेली आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९० (३) अन्वये तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीपर्यंत मागणी न केलेल्या सर्व शिलकी प्रत्येक वर्षाअखेर महानगरपालिकेकडे व्यपगत होतात. उपरोक्त निविदा सिक्युरीटी डिपॉझिट रक्कम भरुन तीन वर्षापेक्षा जादा कालावधी झालेला आहे.

तरी महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९० (४) अन्वये सदर निविदा सिक्युरीटी डिपॉझिट रक्कम परत देणेकरीता मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक असल्याने रिपोर्ट आदेशार्थ सादर.

यावर स्टोअर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसारी मान्य करणेस हरकत नाही. तथापि मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :-

**मा.महापौर साहेब :-** चाणक्य रोड ते बुरुडगांव या रस्त्याचा समावेश करावा.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. निविदाकार यांनी भरलेली निविदा डिपॉझिट रक्कम परत करणेस मंजुरी मिळणे

बाबत सरिता डिस्ट्रीब्युटर्स, ठाणे यांची निविदा डिपॉझिट रक्कम रुपये १०,०००/- फक्त परत देणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. जय भवानी मजूर सहकारी संस्था, यांचे रक्कम रु.५९,०००/- , गुलशन कन्स्ट्रक्शन, एस.एफ.शेख कन्स्ट्रक्शन, आशीर्वाद मजूर सहकारी संस्था, शिववरद पुरुष बचत गट, एन.जी.धाडगे रक्कम रु.४६,५००/-, नितीन इलेक्ट्रीक मजूर संस्था रक्कम रु.३,३००/-, शिवपार्वती मजूर संस्था रक्कम रु.३,०३०/- जगदंबा इलेक्ट्रीक मजूर सह. संस्था रक्कम रुपये ४७,२५०/- या संस्थांचे फॉरफीट झालेले डिपॉझिट रक्कम अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२ प्रस्ताव क्रमांक : १४ दिनांक:- २५/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मौजे बुरुडगांव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत रस्ते,विंड्रो प्लॅटफॉर्म रोड, इत्यादी कामे करणेकामी ई निविदा मागविणे व मा.महासभेच्या मान्यतेबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ -: १) मा.आयुक्त यांची दि.१०/११/२०२० रोजीची मान्यता

२) उप अभियंता, प्रकल्प विभाग यांचे जा.क्र.१२० दि.१२/११/२०२०

३) मा.उपायुक्त (कर) यांचे जा.क्र.२३३ दि.०२/१२/२०२० रोजीचे आदेश.

४) मा.महासभा ठराव क्र.१५ दि.२९/०७/२०२०

५) मा.आयुक्त यांची दि.३१/१२/२०२० रोजीची मंजुरी.

विनंती रिपोर्ट देण्यात येतो दिनांक १०/११/२०२० रोजीच्या घनकचरा विभागाच्या सादर रिपोर्ट नूसार, मौजे बुरूडगाव स.नं.३४ या मनपाच्या कचराडेपोमध्ये सध्या १०० मे.टन क्षमतेचे प्रक्रिया केंद्र चालू असून ५० मे.टन क्षमतेचा दुसरा प्रक्रिया कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारे आवश्यक मशिनरी खरेदी करणेची कार्यवाही चालू आहे व सदर काम करून घेणेबाबत प्रकल्प विभागाला वेळोवेळी कळविले असता त्यांनी अद्याप कार्यवाही केलेली नाही व मा.हरित लवादांच्या आदेशानूसार ५० मे.टन क्षमतेचा प्रकल्प तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक असलेबाबत शहर अभियंता यांचेमार्फत त्वरीत करणेबाबत आदेश होणेबाबत रिपोर्ट सादर केला असता मा.आयुक्त यांनी तात्काळ असा शेरा मारून मान्यता दिलेली आहे.

त्याचबरोबर संदर्भिय पत्र क्र.२ नूसार प्रकल्प अभियंता यांनी कळविले आहे की , कचरा प्रक्रिया प्रकल्पाअंतर्गत रस्ते , ड्रेनेजची कामे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत मंजूर आहेत व त्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेमध्ये ब-याचशा त्रुटी असलेबाबतचे कळविलेले आहे. पुढील कार्यवाहीसाठी संचिका शहर अभियंता यांचेकडेस पाठविलेली आहे. त्यामध्ये दि.३० जानेवारी २०१९ रोजीचा प्रकल्प मान्यता शासन निर्णय व रस्ता व ड्रेनेज यांचे मजिप्रा ने तांत्रिक मान्यता दिलेले अंदाजपत्रक अनुक्रमे रू.५९,३७,९७४/- व १७,५०,३५४/- इतके रकमेचे आहे. परंतू त्याबरोबर मुळ प्रकल्प अहवाल इकडेस मिळालेले नसल्याने त्यातील सविस्तर अंदाजपत्रके , तरतुदी व रक्कम याचा बोध झालेला नाही.

वरील सर्व परिस्थिती पहाता मा. हरित लवादांच्या आदेशानूसार व केंद्रीय प्रदुषण मंडळाच्या दिलेल्या घनकचरा विभाग यांना दिलेल्या सूचना समजून घेण्यासाठी व प्रकल्प अभियंता दिर्घ रजेवर असल्याने याकामी सविस्तर अंदाजपत्रक बनविणेसाठी घनकचरा विभाग प्रमुख यांचेसमवेत दिनांक १८/११/२०२० रोजी समक्ष पाहणी केली. सद्यस्थितीचे जी.पी.एस.फोटो काढून सोबत जोडत आहे. त्याचबरोबर संपूर्ण भुखंडाचे व अस्तित्वातील अंतर्गत मालमत्तेचे सविस्तर सर्व्हेक्षण करून त्या सर्व्हेक्षणांअंती मिळालेल्या नकाशामध्ये घनकचरा विभाग प्रमुख यांना प्रदुषण मंडळाकडून मिळालेल्या सुचनांनूसार करावयाचे नविन कामांचा नकाशा मार्किंग केला. त्यानूसार सार्वजनिक बांधकाम विभाग (महाराष्ट्र शासन) सन २०१९-२० च्या ई.एस.एस.आर. दरानूसार अंदाजपत्रके बनविले असता कामनिहाय रकमेचा तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | रस्ता कॉक्रीटीकरण करणे( मुख्य प्रवेशद्वार ते प्लॅटफार्म ते मान्सुन शेड व प्लॅट फॉर्म ते कंम्पोस्टींग प्लॅट फॉर्म ) ( ABCD ) | ५८,५२,४६०/- |
| २ | मान्सुन शेड शेजारील रस्ता ( DE) | १८,७५,३७४/- |
| ३ | कचरा डेपोच्या पश्चिमेकडील रस्ता (EF) | ४३,४८,९२७/- |
| ४ | दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वार ते प्रस्तावित कंपस्ट प्लॅन्ट (LKJ) | ६,३०,५१४/- |
| ५ | अस्तित्वातील प्लॅट फॉर्मला लिचड गटर करणे. | १५,०५,१०५/- |
| ६ | मान्सुन शेड बांधणे | ६५,१९,९३१/- |
| ७ | नविन प्लॅट फार्म बांधणे | ६८,८८,५२०/- |
| ८ | नविन प्लॅट फार्मला लिचड गटर करणे. | ८,८५,३५६/- |
| ९ | कंम्पोस्टींग प्लॅन्टसाठी शेड उभारणे | ६५,१९,९३१/- |
| १० | वजन काटा उभारण्यासाठी स्थापत्तीक कामे | १,८५,०००/- |
| ११ | कचरा डेपोसाठी ऑफिस बनविणे | ४,००,०००/- |
| १२ | मुतारी व शौचालय व्यवस्था | ५,००,०००/- |
| १३ | बायोमेथेनाझेन प्रकल्पाला संरक्षण भिंत बांधणे | ८,००,०००/- |
| १४ | सविस्तर सर्व्हेक्षण करणे | २,००,०००/- |
| १५ | पाण्याची टाकी बांधणे व तत्सम व्यवस्था | १५,२०,०००/- |
| १६ | सॅनिटरी लॅण्डफिल्ड विकसित करणे | १,५०,००,०००/- |
|  | एकुण | ५,३६,३१,११८/- |

वरील प्रमाणे कामे करण्यासाठी सुमारे रु.५,३६,३१,११८/- ( पाण्याची टाकी बांधणे या कामाव्यतिरीक्त) इतक्या निधिची आवश्यकता आहे. तथापी मुळ मंजुर प्रकल्प अहवाल व निधी उपलब्धते बाबत इकडेस पुरेशी माहिती नसल्याने त्याच बरोबर यापुर्वी प्रकल्पाला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेमध्ये देखील बदल करावयाचे असल्याने खालील प्रमाणे निर्णय होणे अपेक्षित आहे.

१] वरील कामांची निधी उपलब्धतेनुसार व मंजुर प्रकल्पातील बाबींनुसार सांगड घालुन कामे निश्चित करणे

२] जिल्हा दरसुची बदललेली असल्याने व कामाचे तरतुदी मधिल सविस्तर सर्व्हेक्षणानुसार बदल झाल्यानुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने दिलेली तांत्रिक मान्यता रद्द करुन शहर अभियंता स्तरावर सुधारीत तांत्रिक मान्यता घेणे.

३] सविस्तर सर्व्हेक्षणा अंती केलेल्या नकाशामध्ये प्रस्तवित कामंचा नकशा नमुद केलेला आहे. सदर सोबतच्या नकाशास मंजुरी मिळणेस .

४] प्रशासकीय मान्यताप्राप्त सर्व कामे बांधकाम विभागामार्फत होणेस .

५] प्रकल्प अभियंता यांनी संदर्भिय पत्र क्र २ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने दिलेली तांत्रिक मान्यता दिलेल्या कामांची नावे सावेडी कचरा डेपो आहे परंतु प्रत्यक्षात बुरुडगांव कचरा डेपो येथे करण्यात येणार  आहेत. या बाबत योग्य तो आदेश होणेस.

६] वरील बदलास सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेणे.

वरील प्रमाणे मा. घनकचरा व्यवस्थापन विभागाचा अभिप्राय घेवून रिपोर्ट मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सविनय सादर असा रिपोर्ट सादर केला असता सदर प्रस्तावाचे लेखापरिक्षणात शिफारस केली तथापि शासन निर्णय दि.०३/०८/२०१५ प्रमाणे व आजअखेर निधी शिल्लक बाबतचा विभागाने खात्री करणेचा आक्षेप नोंदविलेनूसार मा.मुख्यलेखाधिकारी यांनी रू.३३,६३,४३,९३७/- इतकी रक्कम १४ व्या वित्त आयोग अंतर्गत शिल्लक असलेबाबत अभिप्राय दिला व सदर रकमेचा मा.आयुक्त यांच्या दि.२९/१२/२०२० च्या अभिप्रायाअन्वये १४ वा वित्त आयोग रकमेचे प्रयोजन विचारले असता घनकचरा विभागाने प्रस्तावित कामे २६,८३,५०,०००/- इतके रकमेचा प्रस्तावासाठी खर्च अपेक्षित आहे म्हणजे १४ वा वित्त आयोग अंतर्गत आजरोजी नविन प्रस्तावाकरिता रू.६,७९,९३,९३७/- इतकी रक्कम शिल्लक असल्याचे दिसून येते.

उपरोक्त प्रस्तावास मा.आयुक्त यांनी मान्यता देताना अभिप्राय नोंदविला आहे की, "अहवाहात उक्त प्रमाणे नमूद केलेल्या कामांना महासभेच्या ठरावानूसार होणे गरजेचे आहे व १४ व्या वित्त आयोग मध्ये अनुज्ञेय कामे हाती घेणेस हरकत नसावी. त्यामुळे उक्त कामांचे वरील नियमामध्ये बसत आहे हे खात्री करूनच उक्त नमूद कामांचे ई निविदा करणेस हरकत नाही"

त्यानूसार स्थापत्यीक कामांचा सविस्तर अहवाल सोबतच्या तक्त्यामध्ये जोडलेला आहे. त्या तक्त्याच्या कामांचे अवलोकन केले असता सर्व कामे घनकचरा विषयक असल्याने १४ वा वित्त आयोग अंतर्गत अनुज्ञेय आहेत व सदर कामांना रक्कम रू.५,३६,३१,११८/- इतकी रक्कम आवश्यक आहे. तथापि मंजूर प्रकल्पातून रू.३,३९,१४,५३२/- इतकी रक्कम वापरता येईल व उर्वरीत अतिरीक्त रक्कम रू.१,९७,१६,५८६/- इतकी रक्कम १४ वा वित्त आयोग मधून वापरणे योग्य त्याकरिता रक्कम रू.६,७९,९३,९३७/- शिल्लक असल्याचे अभिप्राय संबंधित विभागाने दिलेले आहेत.

ई निविदा मागवावयाच्या कामांची नावे

| अ.क्र. | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | अ) रस्ता कॉक्रीटीकरण करणे( मुख्य प्रवेशद्वार ते प्लॅटफार्म ते मान्सुन शेड व प्लॅट फॉर्म ते कंम्पोस्टींग प्लॅट फॉर्म ) ( ABCD ) | रू.१,२७,०७,२७५ |
| | ब) मान्सुन शेड शेजारील रस्ता ( DE) | |
| | क) कचरा डेपोच्या पश्चिमेकडील रस्ता (EF) | |
| | ड) दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वार ते प्रस्तावित कंपस्ट प्लॅट (LKJ) | |
| २ | अ) अस्तित्वातील प्लॅट फॉर्मला लिचड गटर करणे. | रू.२३,९०,४६१ |
| | ब) नविन प्लॅट फार्मला लिचड गटर करणे. | |
| ३ | मान्सुन शेड बांधणे | रू.१,३०,३९,८६२ |
| | कंम्पोस्टींग प्लॅटसाठी शेड उभारणे | |
| ४ | नविन प्लॅट फार्म बांधणे | रू.६८,८८,५२० |
| ५ | वजन काटा उभारण्यासाठी स्थापत्तीक कामे | रू.१,८५,००० |
| ६ | कचरा डेपोसाठी ऑफिस बसविणे | रू.३२,२०,०००/- |
| | मुतारी व शौचालय व्यवस्था | |
| | बायोमेथेनाझेन प्रकल्पाला संरक्षण भिंत बांधणे | |
| | पाण्याची टाकी बांधणे व तत्सम व्यवस्था | |

| | | |
|---|---|---|
| ७ | सविस्तर सर्व्हेक्षण करणे | रू.२,००,००० |
| ८ | सॅनिटरी लॅण्डफिल्ड विकसित करणे | रू.१,५०,००,००० |

त्यानूसार सोबतच्या तक्त्यातील  काम क्र.१ ते १२ मंजूर डी.पी.आर.मध्ये असल्याने व त्यास मा.आयुक्त यांनी दि.३१/१२/२०२० रोजी मान्यता दिलेली असल्याने सोबतच्या मसुद्याप्रमाणे समकक्ष कामे एकत्रित करून शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिलेल्या कामांची ई निविदा काढणेस मान्यतेस सादर व उर्वरीत काम क्र.१३ ते १६ कामांना व प्रस्तावित रिपोर्टला मा.महासभेची मान्यता मिळणेकामी मा.महासभेसमोर निर्णयास्तव ठेवणेस सादर व मा.महासभेच्या मान्यतेनंतर ई निविदा काढणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यतेस रिपोर्ट सविनय सादर.

ठराव :- बुरुडगांव सर्व्हे नं.३४ कचरा डेपो अंतर्गत निविदा क्र.६४४०७५ व ६४४०९८ हे दोन टेंडर शेड बांधणे रु.१,१६,४२,७७३/- व रस्ता कॉक्रीटीकरण रु.१३,४५,७८२/- इतक्या रक्कमेचे दोन्ही कामे मंजुर आहेत. तथापि प्रत्यक्ष कच-यावर प्रक्रिया करणा-या मशिनरी ठेकेदाराने काम करण्यासाठीचे शेडमध्ये आवश्यक आकारामध्ये वाढ झालेने निविदेमधील बाबीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होणार आहे. त्यामुळे प्रत्यक्षात काम करतांना स्टील, लोखंड, सिमेंट, कॉक्रींट इ. बाबीमध्ये निविदा तरतुदीपेक्षा जादा वाढ होणार आहे. त्यामुळे खर्चामध्ये वाढ होणार आहे.

NGT मुळे सदर काम त्वरीत करण्याचे असलेने आहे त्याच ठेकेदाराकडून काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास १४ वित्त मधुन मंजुरी देण्यांत येत आहे. व काम त्याच मंजुर ठेकेदाराकडूनच निविदा मंजुर दराने करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

---*---

चर्चा :- **मा.महापौर साहेब :-** चाणक्य रोड ते बुरुडगांव या रस्त्याचा समावेश करावा.

---*---

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर. बुरुडगांव सर्व्हे नंबर ३४ कचरा डेपो अंतर्गत निविदा क्र.६४४०७५ व ६४४०९८ हे दोन टेंडर शेड बांधणे रु.१,१६,४२,७७३/- व रस्ता कॉग्रीटीकरण रु.१३,४५,७८२/- इतक्या रक्कमेचे दोन्ही कामे मंजुर आहेत. तथापि प्रत्यक्ष कच-यावर प्रक्रिया करणा-या मशिनरी ठेकेदाराने काम करण्यासाठीचे शेडमध्ये आवश्यक आकारामध्ये वाढ झालेने निविदेमधील बाबीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होणार आहे.

त्यामुळे प्रत्यक्षात काम करतांना स्टील, लोखंड, सिमेंट, कॉंक्रीट इ.बाबीमध्ये निविदा तरतुदीपेक्षा जादा वाढ होणार आहे. त्याकरीता अंदाजे १ कोटी अतिरिक्त रक्कम आवश्यक आहे.

राष्ट्रीय हरीत लवादातील आदेशामुळे सदर काम त्वरीत करण्याचे असलेने आहे. त्याच ठेकेदाराकडून काम करणे आवश्यक आहे. त्यामुळे येणा-या वाढीव खर्चास किंवा १४ किंवा १५ वित्त मधुन मंजुरी देण्यांत येत आहे. सुधारीत अंदाजपत्रक रु.१,१६ लक्ष ऐवजी रु.२,१६,४२,७७३/- रक्कमेस ही सभा मान्यता देत आहे. व काम त्याच मंजूर ठेकेदाराकडूनच निविदा मंजूर दराने करुन घेणेस मान्यता देण्यांत येत आहे.  सर्व्हे नंबर ३४ कचराडेपो मुख्य प्रवेश व्दाराजवळील पोल शिफ्टींग करणेचे कामास रक्कम रुपये १,२८,५२५/- चे खर्चास १४ व्या वित्त आयोगातुन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : १५** **दिनांक:- २५/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रोफेसर कॉलनी चौक सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट येथे Tesla Refurbished एम.आर.आय.मशिन (Turn key project) कार्यान्वीत करणे करीता स्थापत्य कामे करणे बाबत ...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४६ दिनांक ११/११/२०२०.

२) मा.महापौर यांचे दिनांक १८/०१/२०२१ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादरर करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रोफेसर कॉलनी चौक सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट येथे Tesla Refurbished एम.आर.आय. मशिन (Turn key project) कार्यान्वीत करणे बाबत संदर्भीय स्थायी समिती ठरावान्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. याबाबत मा.महापौर यांनी देखील संदर्भीय पत्रान्वये प्रोफेसर कॉलनी चौक सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट या ठिकाणी एम.आर.आय. स्कॅन मशिन बसविणे बाबत सुचित केले आहे.

सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल येथील सद्यस्थितीत असलेल्या भाजी मार्केटच्या ठिकाणी अनेक वर्षापासुन कुठल्याही स्वरुपाचा वापर होत नाही. सावित्रीबाई फुले भाजी मार्केटच्या ठिकाणी ओटयांचे बांधकाम करण्यांत आलेले आहे. सदर ठिकाणी मा.उपायुक्त (कर) यांच्या समवेत समक्ष स्थळ पहाणी केली असता एम.आर.आय.मशिन बसविणे झाल्यास सध्या अस्तित्वात असलेल्या ओटयापैकी काही ओटे पाडावे लागतील. याबाबत एम.आर.आय.मशिन बसविणे करीता आवश्यक ती स्थापत्य कामे करावी लागणार आहेत. मनपाच्या आर्किटेक्ट पॅनल वरील नियुक्त आर्कीटेक्ट अविष्कार ग्रुप या एजन्सी मार्फत एम.आर.आय.सेंटर व सिटी स्कॅन सेंटर विकसीत करणे करीता अस्तित्वातील काही ओटे Demolish करणे व आराखडयानुसार बांधकाम करणे बाबत सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन अंदाजपत्रकीय रक्कम रु.५१,२५,५२८/- इतकी आहे. यामध्ये आर्किटेक्ट कन्सलटंट फी व GST चा समावेश आहे.

सदर ठिकाणी अस्तित्वात असलेल्या भाजी मार्केट बाबत मा.सहाय्यक संचालक नगररचना यांचा खालील प्रमाणे अभिप्राय प्राप्त झालेला आहे.

१) नगररचना योजना क्र.४ अंतिम भुखंड क्र.२८ ही जागा अहमदनगर शहराच्या मंजूर विकास योजनेत आरक्षण क्र.१९ अन्वये भाजी मंडई व व्यापारी संकुल या कारणासाठी आरक्षीत असुन ही जागा एकात्मिक शहर विकास योजनेतुन व्यापारी संकुल व भाजी मंडई यासाठी विकसित करण्यात आलेली आहे. शासनाने नव्याने लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र.४.२.७.५ (क्यु) नुसार महानगरपालिकेस एकुण आरक्षणाच्या ४० टक्के इतके क्षेत्र इतर कारणासाठी वापरता येवू शकेल.

२) सदर भाजी मंडई व व्यापारी संकुल इमारतीचे बांधकाम करणेसाठी सन २००२-२००३ मध्ये रु.९१ लक्ष एवढा खर्च आलेला आहे. ते सावेडी उपनगरासाठी विकसित केलेले भाजी मार्केट असुन त्याचा वापर चालू ठेवता येईल किंवा कसे याबाबत देखील निर्णय होणे आवश्यक आहे.

३) सदर जागा भाडेतत्वावर देणेसाठी मार्केट विभाग मनपा यांचे मार्फत यापुर्वी जाहीर लिलाव ही करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सदर भाजी ओटे भाडयाने देण्यांत आलेले आहेत किंवा कसे याबाबत मार्केट विभाग मनपा यांचे देखील अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार सहाय्यक संचालक यांनी दिलेल्या अभिप्रायामधील बाब क्र.१ नुसार कार्यवाही करणे बाबत मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच बाब क्र.२ बाबत उचित आदेश होणे आवश्यक आहे. व बाब क्र.३ बाबत मार्केट विभाग यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सहाय्यक संचालक नगररचना यांचे अभिप्रायानुसार कार्यवाही करुन तदनंतर स्थापत्य कामासाठी येणा-या खर्चास व कामास १४ वित्त आयोगातील प्राप्त अनुदानाच्या व्याजातुन प्रस्तावित करणे बाबत मंजुरी मिळणेस्तव मा.महासभेकडेस सादर करणे बाबत प्रस्ताव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, उपअभियंता प्रकल्प विभाग यांचे प्रस्तावानुसार अ प्रमाणे कार्यवाहीकरीता सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त (कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे महासभेसाठी सादर करणेस मान्यता.

चर्चा :-

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. एमआरआय मशिन स्वत:चे पाहीजे.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रोफेसर कॉलनी चौक सावेडी येथील सावित्रीबाई फुले भाजी मार्केट येथे Tesla Refurbished एम.आर.आय.मशिन (Turn key project) कार्यान्वीत करणे करीता स्थापत्य कामासाठी येणा-या खर्चास व कामास १४ वित्त आयोगातील प्राप्त अनुदानाच्या व्याजातुन प्रस्तावित करणेस ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०२** **प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक:- २५/०६/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत अत्याधुनिक सुविधा सहित प्रकल्प विकसित करणे बाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.महापौर श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे यांची दि.२०/५/२०२१ रोजीची यादी.
२) इकडील सा.बां.वि.जा.क्र.२६४ दि.२८/५/२०२१ सहाय्यक संचालक यांना दिलेले पत्र.
३) सहाय्यक संचालक,न.र.यांचेकडील नगररचना वि.१२८६/२१ दि.१८/०६/२०२१ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, अहमदनगर महानगरपालिकेची पिंपळगांव माळवी येथे जागा असुन सदर जागेवर चित्रनगरी विकसित केल्यास मनपाच्या उत्पन्नात भर पडेल तसेच आजुबाजुचा परिसर विकसीत होवून पर्यटनाला चालना मिळेल. चित्रनगरी विकसीत करण्याच्या प्रकल्पासाठी मा.केंद्र शासन व मा.राज्य शासनाकडे निधी मागणी करण्यांत यावी. सदर प्रकल्पामुळे शहरातील बेरोजगांराना रोजगार उपलब्ध होईल तसेच शहरातील नागरिकांना फिरण्यासाठी प्रेक्षणीय स्थळ निर्माण होईल. मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता असे मोठे प्रकल्प राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देता येईल. शहरात विकासाची कामे करणे सोयीचे होईल. यासाठी पिंपळगांव माळवी येथील जागेत धोरणात्मक बाब असल्याने चित्रनगरी विकसित करण्याच्या दृष्टीने योग्य तो प्रस्ताव तयार करुन मा.महासभेपुढे घेणे बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

अहमदनगर महानगरपालिकेची पिंपळगांव माळवी येथील जागेत चित्रनगरी विकसीत करणे बाबतचा सविस्तर प्रस्ताव तातडीने तयार करुन मा.महासभेपुढे ठेवण्याबाबत मा.महापौर यांनी वरील संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये कळविले आहे.

त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये सहाय्यक संचालक यांना आपल्या विभागाकडून पिंपळगांव माळवी येथील जागेचे नकाशे, मोजणी नकाशा व उतारे उपलब्ध करुन देण्यांत यावेत. याबाबत पत्र दिलेले होते. त्यानुसार सहाय्यक संचालक, नगररचना यांनी संदर्भीय पत्र क्र.३ अन्वये पिंपळगांव माळवी जागेचे नकाशे, मोजणी नकाशा व उतारे इकडेस पाठविलेले आहेत.

अहमदनगर महानगरपालिकेचे पिंपळगांव माळवी येथील जागेच्या क्षेत्राचा तपशिल-

१) अहमदनगर शहरापासुन अंतर - १५.० कि.मी.

| | |
|---|---|
| २) जागेचे क्षेत्रफळ - अ) जेऊर गट क्र.१८०२ | - २१८.१९ हेक्टर आर. (५३९.१५ एकर) |
| ब) पिंपळगांव माळवी गट क्र.१०३० | - ६१.९७ हेक्टर आर. (१५३.१३ एकर) |
| एकुण क्षेत्रफळ | - २८०.१६ हेक्टर आर (६९२.० एकर) |

सद्यस्थितीत पिंपळगांव माळवी येथील मनपाच्या जागेत पिंपळगांव तलाव, पंपिंग स्टेशन, कुत्र्याचे निर्बीजीकरण करणे केंद्र, स्मृती उद्यान, जुने विश्रामगृह (पडीक स्वरुपात) इ. वास्तु आहेत. तसेच सामाजिक वनीकरणास विभागास वापरावयास दिलेली जागा ताब्यात घेणे आवश्यक आहे.

विषयांकित पिंपळगांव माळवी ही जागा अहमदनगर शहरापासुन अंदाजे १५ कि.मी. अंतरावर असुन मनपा हद्दीपासुन अंदाजे ८.० कि.मी. इतके अंतरावर आहे. पिंपळगांव तलाव येथे पाण्याची उपलब्धता असुन सदर परिसर हा निसर्गरम्य आहे. त्यापुढे डोंगरगण व मांजरसुंबा ही धार्मिक स्थळे ही आहेत. सदरचा परिसर हा डोंगरद-याचा असुन पर्यटनाच्या दृष्टीने उपयुक्त असा आहे.

सदर ठिकाणी मनोरंजन नगरी (अम्युजमेंट पार्क ), मोठया स्वरुपातील अद्यावत उद्याने, विविध स्वरुपाची करमणूकीची साधणे उभारणी केल्यास नगर शहर, तसेच तालुका, जिल्हा व राज्यातून नागरिकांचा त्यास चांगला प्रतिसाद मिळू शकेल. व शहराच्या वैभवातही भर पडेल. व त्यातुन निश्चीतच महानगरपालिकेस एक उत्पन्नाचे साधन मिळू शकेल. तसेच महानगरपालिकेच्या हद्दीतील व नगर तालुक्यातील बेरोजगांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल.

पिंपळगांव माळवी येथे वरील प्रमाणे प्रकल्प उभारल्यास सदर परिसरातील पर्यावरणास कोणत्याही स्वरुपाचा -हास होणार नसुन चित्र नगरीमुळे निसर्ग सौदर्यात भर पडणार आहे.

पिंपळगांव माळवी येथे वरील प्रमाणे प्रकल्प उभारणे कामी खालील नमुद पर्याय उपलब्ध होऊ शकतात.

१) प्रकल्प उभारणे करीता मा.केंद्र किंवा मा.राज्य शासनाकडून निधीची मागणी करुन प्रकल्प उभारणे यासाठी प्रकल्प सल्लागार संस्था नेमुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक राहील.

२) एक्सप्रेशन ऑफ इनट्रेस (इ.ओ.आय.) या तत्वावर प्रकल्प उभारणे.

३) बांधा वापरा व हस्तांतरीत करा (बी.ओ.टी.) या तत्वावर प्रकल्प उभारणे.

वरील प्रमाणे प्रकल्प उभारणेकामी नगररचना विभागाकडून उक्त जागेची मोजणी करुन सदर ठिकाणी अतिक्रमण असल्यास ती निष्कासीत करुन घेणे आवश्यक आहे. तसेच सदर प्रकल्प उभारणी करीता प्रथमतः विविध शासकीय कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र व परवानग्या घ्याव्या लागतील. (उदा.वन विभाग, पर्यावरण विभाग इ.)

तरी उक्त प्रस्ताव प्राथमिक स्वरुपाचा असून अशा प्रकारचे प्रकल्पांची पाहणी करुन माहिती घेवून, अभ्यासकरुन पुढील कार्यवाहीसाठी सदर बाब धोरणात्मक असल्याने निर्णयास्तव मा.महासभेकडे पाठविणेस आदेशार्थ सविनय सादर.

--*--

चर्चा :-

**मा.महापौर साहेब :-** पिंपळगांव तलाव येथे ७५० एकर जागा आहे. २०० ते ३०० एकर तलावाच्या पश्चिम भागातील मोकळी जागा आहे त्याठिकाणी साई चित्र नगरी उपक्रमास भाडयाने देण्यांत येईल त्यामुळे नगर शहराचे नांव लौकीक वाढेल. एक समिती करु कोराना काळात उत्पन्न भाडे पाहीजे. घरपट्टी वसुली झाली नाही. घरपट्टीचे उपायुक्त दर्जाचे अधिकारी नेमून प्रकरण मार्गी लावावे. घरपट्टीत वाढ झाली पाहीजे. धोरणात्मक निर्णय घेतला पाहीजे. कुठेतरी निर्णय घेतले पाहीजे. २०० कोटीचा फुगीर आकडा आहे. सहाय्यक आयुक्तांना नेमा. स्वतंत्र दर्जाचा अधिकारी नेमून महानगरपालिकेचे उत्पन्न कसे वाढेल ते पाहीले पाहीजे. महानगरपालिकेच्या हजारो कोटीच्या जागा आहेत या जागातुन उत्पन्न होवू शकते. आपल्या महानगरपालिकेचे

उत्पन्न वाढविण्यासाठी चांगले निर्णय घ्यावे लागतील. प्रोफेसर कॉलनीच्या ठिकाणी १० मजले उभारु शकतो. आहे त्याच गाळे धारकांना देवू. चित्रनगरी संदर्भात चांगली वास्तु होईल. नगर शहराचे उत्पन्न वाढेल यासाठी चळवळ उभी केली पाहीजे. हॉटेल वाल्यांनी पुढाकार घेतला पाहीजे. मुळाधरण, अवतार मेहेरबाबा, गणपती मंदीर आहे, व्हीआरडीई आहे. लोक थांबतील असा विचार करुन चांगले काम करावे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** डीपीआर मध्ये पहिले पैसे आहेत. १६ ते १७ गाडया घ्यायच्या आहेत. गाडया जास्त निधी कमी कसे नियोजन करणार

**रक्तपेढी विभाग प्रमुख श्री.शेडाळे :-** जेवढया घेणे शक्य होणार तेवढयाच घेणार. जेसीबी ३ असतील व २ घेवू शकतो तर तेवढयाच घेवू.

**मा.महापौर साहेब :-** जी.एम.पोर्टलवर टाकू. जेवढया येतील तेवढयाच घेवू. उरलेला निधी १५ व्या वित्त आयोगातुन घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** हाजी हमीद ताकिया ट्रस्टने मागणी केली त्या मार्गाला नाव देण्याची मागणी करतो. प्र.क्र.१ साठी भरभरुन निधी दिला. त्यांनी जी कामे केली त्यांनी ब-याच लोकांना निधी दिला. ब-याच लोकांना दिला नाही. त्यांचेकडे लीस्ट आहे. राजकारणात समाजकारणात भरारी त्यांनी मारली आहे. सावेडी गावचे महापौर आहेत. अत्यंत गरीब कुटुंबातील व्यक्ती, जे काही कमावले ते स्वकर्तृत्वावर कमावले आहे. अनेक लोकांना मदत केली. सगळया कामांना शुभेच्छा. उपमहापौर यांनी चांगले काम केले. अतिशय मितभाषी, संयमी महिला म्हणुन चांगले नांव लौकीक कमावले. सभागृह नेता यांनी चांगले प्रयत्न केले. मृत्यू दाखल्यासाठी चांगले काम केले. जुने कागदपत्राचे जतन करण्याचे प्रयत्न केले. सभापती, स्थायी समिती यांचे चांगले काम आहे. या अडीच वर्षात तक्रारी, भांडणे, वाद झाले नाहीत. महापौर निधी असेल तो ही पुढे मिळावा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** ऐतिहासिक कागदपत्राच्या बाबतीत दोन तीन संस्थांनी संपर्क केला. महानगरपालिकेत बसून जागेवर स्कॅन करतो व महानगरपालिका वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत येईल. हे माझ्या कामाचे फलीत होईल.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** दोन महिन्यांसाठी इलेक्ट्रीक मटेरियल देण्याची व्यवस्था करावी. इथापेंनी खड्डे पॅचिंग अर्जंट करुन घ्यावी अशी विनंती करतो.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** यशोदा नगर कमानी समोरील खड्डे डिटेक्ट करुन बुजवा. बुरुडगांव कचराडेपो वर झाडे लावले पण ते जळुन गेले. उद्यान विभागाने लेखी द्यावे.

**उद्यानविभाग प्रमुख श्री.लहारे :-** २०१८-२०१९ निविदा बाकी होती. कचरा डेपोस मुदतवाढ देण्यांत आली. झाडे तेथे आहेत. ट्रीगार्ड या बाबी प्रविष्ठ होत्या ३ लाख डिपॉझिट ठेवले आहे. पुर्ण पेमेंट दिलेले नाही. भेट दिली. ३५ दिवसापुर्वी भेट दिली त्यावेळी होते. ७८० झाडे आहेत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** आयुक्त साहेबांनी चौकशी करावी व पुढच्या मा.महासभेत माहिती द्यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सावेडी कचरा डेपोती झाडांचे बील अदा करु नये आयुक्त यांनी चौकशी करावी.

**मा.महापौर साहेब :-** माझी तिसरी टर्म आहे. सर्वांचे सहकार्य मिळाले. मा.आमदार , मा.कर्डिले साहेब सर्वांचे सहकार्य लाभले. सर्व वयातील ज्येष्ठ नेते, सभागृह नेते असतील माजी सभागृह नेते दुलम असतील सर्वांनी सहकार्य केले. राष्ट्रवादी, बसपा, शिवसेना सर्वांनी सहकार्य केले. सर्व विभागातील

अधिकारी, पदाधिकारी यांनी साथ दिली. त्यामुळे श्रेय सर्वांना देतो. भांडण न करता जास्तीत जास्त कामे कसे होतील हे पाहू .

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मा.पठारे यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदनाचा ठराव मांडतो.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर मा.महासभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार अ.नगर मनपाच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत मनपाच्या उत्पन्नाच्या दृष्टिने तसेच पर्यटनाच्या दृष्टिने अत्याधुनिक सुविधासहीत चित्रनगरी प्रकल्प विकसीत करणेस ही सभा मान्यता देत आहे. सदर चित्रनगरी प्रकल्पास साई चित्रनगरी असे नांव देण्यास ही सभा मंजूरी देत आहे. सदर प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असल्याने मा.केंद्र शासन व मा.राज्य शासनाकडे निधी मिळणे कामी सविस्तर प्रस्ताव तयार करून पाठविण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच पिंपळगांव माळवी तलावाच्या परिसरातील मोकळी जागा साई चित्रनगरी या प्रकल्पास आरक्षित करणे बाबत कार्यवाही करावी.

सदर ठिकाणी चित्रपट नगरी लवकरात लवकर उभारण्याच्या दृष्टिने विशेष समिती गठीत करण्यात येत आहे. त्या समितीवर अध्यक्ष म्हणुन मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे, महापौर व सदस्य मा.आयुक्त, मा.उपमहापौर, अतिरिक्त आयुक्त, तसेच चित्रपटाशी निगडीत असणारे निर्माते, अभिनेते ॲड.पुष्कर तांबोळी, अखिल भारतीय नाटय परिषदचे नगर शाखा अध्यक्ष अमोल खोले, चित्रपट लेखक व दिग्दर्शक ॲड अभिजीत दळवी, अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अहमदनगर जिल्हा भरारी पथक प्रमुख शशिकांत नजान, अहमदनगर फिल्म फौंडेशनचे संस्थापक व निर्मीती व्यवस्थापक प्रशांत जठार, निर्माते व निर्मिती व्यवस्थापक प्रविण मेढे, अभिनेते व संयोजक सुदर्शन कुलकर्णी, चैत्राली जावळे, नितीन शेलार यांची नेमणुक करण्यात येत आहे. सदर समितीच्या सल्लागार समितीचे अध्यक्ष चित्रपट निर्माते उद्योजक नरेंद्रजी फिरोदिया, व सल्लागार समितीमध्ये निर्मात व उद्योजक बलभिमजी पठारे , चित्रपट निर्माते व उद्योजग गौतमजी मुनोत, चित्रपट निर्माते स्वप्नील मुनोत, निर्माते अनिल जोशी आणि अहमदनगर जिल्हा मराठा प्रसारक मंडळाचे मास्क कॉम विभागाचे मुख्य संदिप गि-हे यांची नियुक्ती करण्यात येत आहे. यास ही सभा मान्यता देत आहे. मनपा प्रशासन व समिती यांनी संयुक्त विद्यमाने प्रकल्पासाठी आवश्यक असणारा निधी मिळणे कामी मा.केंद्रशासन व मा.राज्य शासनाकडून पाठपुरावा करावा. तसेच विविध चित्रपट कंपनी व त्यांचे प्रमुख यांचेशी संपर्क साधून सदर ठिकाणी चित्रपट निर्मिती साठी मागणी करावी या माध्यमातून मनपास उत्पन्न मिळेल.

तरी याबाबत प्रशासनाने पुढील योग्य ती उचित कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,

अनुमोदक :- मा.सौ.सोनाबाई तायगा शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.    जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.-    दिनांक : २१/०६/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे होणा-या विशेष सर्वसाधारण सभे बाबत...

प्रति,

१) श्री.शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
२) श्री.झारखंडे, उपमहापौर कार्यालय,
३) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय,
४) श्री. बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
५) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता कार्यालय
६) श्री.प्रदीप निलाखे, महिला व बालकल्याण समिती कार्यालय,
७) श्री.राज चोटीले, सिक्युरिटी गार्ड
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : २१/०६/२०२१

**विषय : अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता होणा-या मा.विशेष सर्वसाधारण सुचना क्रमांक ०२ मध्ये आपले नावासमोरील नगरसेवकांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करणे बाबत...

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०२ **शुक्रवार दिनांक २५-०६-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी खालील प्रमाणे आपल्या नावासमोर दर्शविलेल्या सन्माननीय सदस्यांना व्हिडीओ कॉन्फरन्सींग बाबत मार्गदर्शन करावे.

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ११ - ब | घुले अविनाश हरिभाऊ **सभा□ती, स्थायी समिती** | 9225322062 | श्री.विष्णु देशमुख |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| २ | ११ - ड | शेख नजीर अहमद अ.रज्जाक | 9272225862 | |
| ३ | १२ - अ | बाळासाहेब मारुती बोराटे | 9422222079 | |
| ४ | १२ - ड | कावरे दत्तात्रय हरीभाऊ | 9881777760 | |
| ५ | १३ - अ | कवडे उमेश (गणेश) खंडेराव | 9270443333 | |
| ६ | १३ - ड | लोंढे सुभाष सो□ानराव | 9921799992 | |
| ७ | १४ - अ | भागानगरे प्रकाश बाबुराव | 9422230181 | |
| ८ | १४ - ड | भोसले गणेश □ुंडलिक | 9422221596 | |
| ९ | १५ - अ | गायकवाड □रसराम बाळू | 9860536395 | |
| १० | १५ - ड | शिंदे अनिल माधवराव | 9422223268 | |
| | | | | |
| ११ | ०४ – क | योगीराज शशिकांत गाडे | 9689896982 | श्री.किरण उजागरे |
| १२ | ०५ – अ | दुलम मनोज लक्ष्मण | 9225700007 | |
| १३ | ०५ – ड | गंधे (भैय्या) महेंद्र मोहनिराज | 9422220460 | |
| १४ | ०६ – ड | बारस्कर रविंद्र रावसाहेब **सभागृहनेता** | 9422221333 | |
| १५ | ०७ – ब | बडे अशोक किसन | 9822451468 | |
| १६ | ०७ – ड | वाकळे कुमार बबन | 9730015555 | |
| १७ | ०८ – क | शिंदे सचिन चंद्रशेखर | 9422229078 | |
| १८ | ०८ – ड | नळकांडे शाम किसन | 9271907171 | |
| १९ | ०९ – क | छिंदम श्री□ाद शंकर | 9823055555 | |
| २० | १० – अ | उणावणे अक्षय सदानंद | 9130065007 | |
| | | | | |
| २१ | ०६ - ब | वाकळे बाबासाहेब सोन्याबा□ु, **महा□ौर** | 9422226510 | श्री.किशोर कानडे |
| २२ | १० - ड | शेख मुदस्सर जहांगीर | 8007863232 | |
| २३ | ०४ – ड | शिंदे स्वप्निल रोहिदास | 7774937777 | |
| २४ | ०१ – ड | बारस्कर सं□त विजय **विरोधी □क्ष नेता** | 9890408050 | |
| २५ | ०१ – अ | बोरुडे सागर अर्जुन | 9822115406 | |
| २६ | ०२ – अ | □ाऊलबुधे विनीत नाथ | 9822076968 | |
| २७ | ०२ – ड | त्र्यंबके सुनिल नारायण | 9552690159 | |
| २८ | ०३ – अ | आसिफ सुलतान | 9822828589 | |
| २९ | ०३ – ड | खान समद वहाब | 9860147715 | |
| | | | | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| ३० | ०९ – ड | सुप्रिया धनंजय जाधव | 9860655555 | श्रीमती. हेमलता साळवे |
| ३१ | १० – ब | जाधव अश्विनी सचीन | 9850100009 | |
| ३२ | १० – क | □ंजाबी अनिता जस□लसिंग | 9422236460 | |
| ३३ | ११ - अ | □रगे रु□ली जोसेफ | | |
| ३४ | ११ - क | कुरेशी □रवीन आबीद | 9665025555 | |
| ३५ | १२ - ब | सुरेखा संभाजी कदम | 9422222003 | |
| ३६ | १२ - क | लोखंडे मंगल सुनिल | 9423561112 | |
| ३७ | १३ - ब | चितळे सोनाली अजय | 9881451331 | |
| ३८ | १४ - ब | जगता□ शितल संग्राम | | |
| ३९ | १४ - क | चो□डा मीना संजय | 9822025757 | |
| | | | | |
| ४० | ०४ – ब | बोरकर शोभा सुधाकर | 9225522255 | श्रीमती.मेघना निकम |
| ४१ | ०५ – ब | शिंदे सोनाबाई तायगा | 7350333303 | |
| ४२ | ०५ – क | आशा शिवाजीराव कराळे | 9422221015 | |
| ४३ | ०६ – अ | जाधव □ल्लवी दत्तात्रय | 9604390180 | |
| ४४ | ०६ – क | ताठे वंदना विलास | 9527525888 | |
| ४५ | ०७ – अ | भाकरे रीता शैलेश | 9860755573 | |
| ४६ | ०७ – क | सप्रे कमल दत्तात्रय | 9822051375 | |
| ४७ | ०८ – अ | शेंडगे रोहिणी संजय | 9822788388 | |
| ४८ | ०८ – ब | बोरुडे □ष्□ा अनिल | 9422227473 | |
| ४९ | ०९ – अ | चव्हाण शीला दी□ | 9422221555 | |
| | | | | |
| ५० | ०९ - ब | ढोणे मालन सुरेश<br>**उ□महा□ौर** | ९९२३३१४२२४ | सौ.जोशी स्मिता |
| ५१ | १७ – क | शेळके लताबाई बलभिम<br>**सभा□ती,महिला व बा.समिती** | 9657979797 | |
| ५२ | १३ – क | गेनाप्□ा सुवर्णा संजय<br>**उ□सभा□ती, मबाकस** | 9420689999 | |
| ५३ | ०१ – ब | सौ.मिना शिवाजी चव्हाण | 8788206185 | |
| ५४ | ०१ – क | बारस्कर दि□ाली नितीन | 9822415757<br>8087099198 | |
| ५५ | ०२ – ब | वारे रु□ाली निखील | 9850000852 | |
| ५६ | ०२ – क | □वार संध्या बाळासाहेब | 9561252700 | |

| अ. क्रं. | प्रभाग/जागा क्रमांक | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | तांत्रिक सहाय्यक |
|---|---|---|---|---|
| | | | 8888757636 | |
| ५७ | ०३ – ब | खान मीनाज जाफर | 9021112312 | |
| ५८ | ०३ – क | शेख रिजवाना फारूक | 9881870245 | |
| ५९ | ०४ – अ | सौ.ज्योती अमोल गाडे(कर्डीले) | 8975872525 | |
| | | | | |
| ६० | १५ - ब | जाधव सुवर्णा दत्ता | 9271881256<br>9404615151 | श्री.उपलंची |
| ६१ | १५ - क | खैरे विद्या दि□क | 9881742471 | |
| ६२ | १६ - अ | शिंदे शांताबाई दामोदर | 9890537625 | |
| ६३ | १६ - ब | कोतकर सुनिता संजय | 8888026575 | |
| ६४ | १६ - क | □ठारे विजय मोहनराव | 9623240303 | |
| ६५ | १६ - ड | येवले ज्ञानेश्वर ऊर्फ अमोल शिवाजी | 9881778181 | |
| ६६ | १७ - अ | कांबळे राहुल दादु | 9922708803 | |
| ६७ | १७ - ब | ननावरे गौरी गणेश | 9422319181 | |
| ६८ | १७ - ड | कोतकर मनोज शंकर | 9890449126 | |
| | | | | |
| ६९ | स्विकृत सदस्य | आढाव मदन सं□त | ९२७२८१७१११ | श्री.सोनु चौधरी |
| ७० | स्विकृत सदस्य | शेळके संग्राम बबनराव | ९६८४१११११११ | |
| ७१ | स्विकृत सदस्य | आंधळे रामदास नानाभाउ | ९८२३०३६१६१ | |
| ७२ | स्विकृत सदस्य | शेटीया वि□ुल मुलचंद | ९८२२०६९८११ | |
| ७३ | स्विकृत सदस्य | कातोरे राजु आसाराम | ९८९०९०२२९१ | |

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव विभाग.वशि.- दिनांक : २१/०६/२०२१

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०२ **शुक्रवार दिनांक २५-०६-२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सींग व्दारे **अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ४) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ५) | श्रीमती.मेघना निकम, नगरसचिव विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०२, शुक्रवार दि. २५/०६/२०२१ रोजीचा विशेष सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| पान क्रमांक | नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री.बाळासाहेब भोर | |
| २ | श्री.झिने, अकौंट विभाग | |
| ३ | श्री.झारखंडे | |
| ४ | श्री.बाबासाहेब कोतकर | |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

नगरसचिव विभाग.- दिनांक : २१/०६/२०२१

विषय : शुक्रवार दिनांक - २५ / ०६ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.विशेष सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०२ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक २ शुक्रवार दिनांक २५/०६/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे व्हीडीओ कॉन्फरन्सींग व्दारे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.४७०/- (अक्षरी रक्कम रुपये चारशे सत्तर फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या * **सभेचे चहा नाष्टा बील** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **२ व ३ ची बेरीज** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.